श्रीदासराम ग्रंथमाला : पुष्प २६

## अभंग दरबार

ABHANG DARBAR

**संकलक व संपादक :**
श्री. दीपक चंद्रशेखर केळकर
घ.नं. ८२७, श्रीराम निकेतन, श्रीबापूरावजी केळकर वाडा,
सिटी हायस्कूल मागे, गांवभाग, सांगली-४१६ ४१६
दूरध्वनी-(०२३३) २३३२४६३, भ्रमणध्वनी - ०९८२२००७५२८

**प्रकाशक** : श्री. नामदेव हरी पठाडे
मु.पो. हरीपूर, ता. मिरज, जि. सांगली

**प्रथम आवृत्ति :** इ.स. २०११

**प्रकाशन दिन :** फाल्गुन शु.१० शके १९३२
प.पू.श्रीमामामहाराज केळकर जयंती
मंगळवार दि. १५/०३/२०११

© सर्व हक्क संकलक व संपादकाचे स्वाधीन

**मुद्रक** : श्री. अनिल अजित लोखंडे
श्रीदासराम ऑफसेट, सांगली.
दूरध्वनी-(०२३३) २३२२७२९

**प्रसाद मूल्य :** रु.४०/-

**प्रत मिळणेचे ठिकाण :** श्री. दीपक चंद्रशेखर केळकर
घ.नं. ८२७, श्रीराम निकेतन, गांवभाग, सांगली-४१६ ४१६
दूरध्वनी-(०२३३) २३३२४६३, भ्रमणध्वनी - ०९८२२००७५२८

।। श्री ।।

**श्रीदासराम ग्रंथमाला : पुष्प २६**



# अभंग दरबार

**◆ संकलक व संपादक ◆**

**श्री. दीपक चंद्रशेखर केळकर**

◆

**◆ प्रकाशक ◆**

**श्री. नामदेव हरी पठाडे**

आवृत्ति पहिली — सांगली — इ.स. २०११

## संपादकीय

अभंग दरबार हे पुस्तक साधकांच्या हाती देत असताना एक वेगळा आनंद झालेला आहे. कारण या पुस्तकात घेतलेले अभंग हे वाचले किंवा म्हणले असता मनाला एक प्रकारचा आनंद होणार आहे.

प.पू.सद्गुरू श्रीदासराममहाराज यांच्या अथवा आमच्या प.पू.श्रीआण्णांच्या कीर्तनात विषयाला धरून वेगवेगळे अभंग येत असतात. हे अभंग प.पू.श्रीअण्णा व माझे चुलते श्रीअनिलप्रभू केळकर हे चालीत म्हणायला लागले की आपले मन तल्लीन होऊन जाते. असे हे अभंग कीर्तनात काही वेळा पूर्ण म्हणले जातात. अथवा अभंगातील एखादाच चरण म्हणला जातो. असे अभंग सर्वांनाच पाठ नसतात, परंतु ते चालीत म्हणायची काही साधकांची अतीव इच्छा असते. असे काही साधक, माझेकडे काही अभंग लिहून द्या म्हणून मागणी करत असतात व त्याप्रमाणे मी ते अभंग त्यांना लिहूनही देत असतो. अशावेळी माझ्या मनात आले की, असे कीर्तनात येणारे हे सर्व अभंग आपण जर एकत्रित करून प्रकाशित केले तर माझी व सर्वांचीच सोय होईल. याप्रमाणे मी हे अभंग एकत्रित करण्याचे काम सुरू केले व याप्रमाणे अभंग दरबार या पुस्तकात प.पू. श्रीज्ञानेश्वरमहाराजांपासून ते माझे आजोबा प.पू.सद्गुरू श्रीदासराममहाराज यांनी केलेले निवडक अभंग समाविष्ट केलेले आहेत.

असे हे अभंग संकलन करते वेळी आमच्या प. पू. आण्णांवर नितांत प्रेम असणारे श्रीनामदेवराव पठाडे यांची भेट झाली व त्यानी माझे अभंग संकलन करीत असलेचे बघितले. दुसरे दिवशी त्यांनी मला, हे अभंग मी प्रकाशित करतो असे सांगितले. याप्रमाणे अभंग दरबार हे पुस्तक साकार झाले आहे. अशा या पुस्तकातील अभंग म्हणले असता, संतांचा दरबार काय असेल याची आपणाला कल्पना येईल असे वाटते.

या पुस्तकातील अभंग एकत्र करणेकामी मला माझी आई ती.मातोश्री सौ.रोहीणी केळकर हीचे योगदान लाभले आहे. याबद्दल मी तीचा ऋणी आहे. तसेच श्री.कपिल हडदरे व माझे चुलते श्री.अनिलप्रभू केळकर (नानाकाका) यांनी स्वतः काही अभंग लिहून आणून दिले याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

आणखी एक गोष्ट मला येथे नमूद करायची आहे की, मूळ अभंग व या पुस्तकात घेतलेला अभंग यात थोडा पाठभेद आहे. प.पू.श्रीदासराममहाराजांच्या अथवा आमच्या प.पू.आण्णांच्या कीर्तनात ज्याप्रमाणे अभंग म्हणले जातात त्याप्रमाणे अभंग येथे दिलेले आहेत. व हाच पाठभेद आम्हाला प्रमाण आहे.

असे अभंग दरबार हे पुस्तक माझे सद्गुरू श्रीदासराममहाराज केळकर यांचे चरणी अर्पण करतो व हे पुस्तक सर्व साधकांच्या पसंतीला उतरेल अशी आशा व्यक्त करून येथेच थांबतो.

सांगली<br>
महाशिवरात्री **दीपक चंद्रशेखर केळकर**<br>
दि. ०२/०३/२०११



## प्रकाशकाचे मनोगत

कोणत्याही व्यक्तीची प्रारब्धरेषा उगवायला वेळ यावी लागते. तशी माझी प्रारब्धरेषा सन २००२ मध्ये उगवली असे म्हणल्यास कांही वावगे होणार नाही असे मला वाटते.

मी श्रीरामनिकेतनमध्ये सन २००२ पासून दर्शनाला यायला लागलो. यानंतर रोज कीर्तनालाही येवू लागलो. या कीर्तनातील विषय, या विषयाला धरून येणारे अभंग, त्याची लावलेली चाल हे सर्व बघून व ऐकून मी अक्षरशः भारावून गेलो व मला या कीर्तनाची गोडीच निर्माण झाली. प.पू.श्रीआण्णा जो विषय कीर्तनात सांगतात, तसा विषय इतरत्र कोठेही आपल्याला ऐकायला मिळणार नाही. अशा या कीर्तनात येणारे वेगवेगळे अभंग कायम कानावर पडल्याने त्यातील काही अभंग मला पाठ झाले व ते अभंग मी स्वतःही म्हणू लागलो. हे अभंग मी जेव्हा स्वतः म्हणू लागलो तेव्हा या अभंगात काय गोडी आहे हे मला समजले. त्यातच आमचे श्रीहनुमान समाधि मंदीर उपासना मंडळ आहे. त्या उपासना मंडळातही अभंग म्हणण्याची संधी मला मिळते.

असे हे सर्व अभंग म्हणण्यास सोपे जावे म्हणून, ते एकत्रित करून छापावेत असा माझ्या मनात विचार आला. त्यातच माझी व श्री नाना(दीपक केळकर) यांची भेट झाली. त्यावेळी श्री नाना हे या अभंगांचे संकलन करण्याचे काम करीत असल्याचे दिसले. असा हा योगायोग आहे. यानुसार हे अभंग दरबार हे पुस्तक साकार झाले आहे.

असे हे अभंग दरबार पुस्तक प्रकाशित करण्याची संधी मला प.पू.श्रीआण्णांनी दिली याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. तसेच श्री नानांनी वेगवेगळ्या संतांचे 'एकसे एक'अभंग एकत्रित करून दिले याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. या पुस्तकाची कच्ची मुद्रिते तपासण्याचे क्लिष्ट

काम श्री नाना केळकर व प्रा.श्री.नारायण के. आपटे यांनी करून दिले याबद्दल मी त्यांचाही आभारी आहे. या पुस्तकाचे मुद्रण सुबकपणे करण्याचे काम श्रीदासराम ऑफसेटचे श्री. बाळासाहेब लोखंडे यांनी केले आहे. त्यांना मनःपूर्वक धन्यवाद.

अशीच सेवा महाराजांनी माझे हातून करून घ्यावी अशी प्रार्थना प.पू.सद्गुरू श्रीमामामहाराज केळकर, प.पू.सद्गुरू श्रीदासराममहाराज केळकर व प.पू.सद्गुरू श्रीअण्णामहाराज केळकर यांचे चरणी करतो व येथेच पूर्णविराम देतो.

सांगली **नामदेव हरी पठाडे**

दि. ०७/०३/२०११



## –अनुक्रम–

संपादकीय .......................................... एक
प्रकाशकाचे मनोगत ............................... तीन

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराज कृत अभंग | १ |
| २) | श्रीसंत निवृत्तिनाथमहाराज कृत अभंग | ३ |
| ३) | श्रीसंत मुक्ताबाई कृत अभंग | ४ |
| ४) | श्रीसंत एकनाथमहाराज कृत अभंग | ५ |
| ५) | श्रीसंत नामदेवमहाराज कृत अभंग | ९ |
| ६) | श्रीसंत जनाबाई कृत अभंग | १० |
| ७) | श्रीसंत तुकाराममहाराज कृत अभंग | १२ |
| ८) | श्रीसंत निळोबाराय कृत अभंग | २१ |
| ९) | श्रीसंत चोखामेळा कृत अभंग | २२ |
| १०) | श्रीसमर्थ रामदासस्वामी कृत अभंग | २२ |
| ११) | श्रीसंत वेणाबाई कृत अभंग | २७ |
| १२) | श्रीसंत कबीरसाहेब कृत अभंग | २७ |
| १३) | श्रीसंत केशवस्वामी कृत अभंग | २९ |
| १४) | श्रीसंत उद्धवचिद्घनमहाराज कृत अभंग | ३३ |
| १५) | श्रीसंत आनंदमूर्तीस्वामी कृत अभंग | ३३ |
| १६) | श्रीसंत श्रीधरस्वामी कृत अभंग | ३४ |
| १७) | श्रीसंत आनंदनंदनस्वामी कृत अभंग | ३४ |
| १८) | श्रीसंत अमृतराय कृत अभंग | ३४ |
| १९) | श्रीसंत मुकुंदराय कृत अभंग | ३५ |
| २०) | श्रीसंत महिपती कृत अभंग | ३५ |
| २१) | श्रीसंत शिवराम कृत अभंग | ३६ |
| २२) | श्रीसंत शिवदिनी कृत अभंग | ३७ |
| २३) | श्रीसंत भगवंतात्मज कृत अभंग | ३८ |
| २४) | श्रीसंत श्रीरंगात्मज विठ्ठल कृत अभंग | ३८ |
| २५) | श्रीसंत सहजानंद कृत अभंग | ३९ |
| २६) | श्रीसंत ज्योतीपंत महाभागवत कृत अभंग | ३९ |
| २७) | श्रीसंत कृष्णाबाई कृत अभंग | ४० |

२८) श्रीसंत मध्वमुनिश्वर कृत अभंग ४०
२९) श्रीसंत सूरदास कृत अभंग ४१
३०) श्रीसंत मीराबाई कृत अभंग ४१
३१) श्रीसंत विठ्ठल पुरंदर कृत अभंग ४१
३२) श्रीसंत मंबाजीबुवा कृत अभंग ४२
३३) श्रीसंत भिमदासमहाराज कृत अभंग ४२
३४) श्रीसंत कलावतीआई कृत अभंग ४३
३५) श्रीसंत माणिकप्रभू कृत अभंग ४३
३६) श्रीसंत माधवतनय कृत अभंग ४३
३७) श्रीसंत पंतमहाराज बाळेकुंद्रीकर कृत अभंग ४४
३८) श्रीसंत पांडुरंगमहाराज ताम्हनकर कृत अभंग ४५
३९) श्रीसंत निंबरगीकरमहाराज कृत अभंग ५०
४०) श्रीसंत रामभाऊमहाराज यरगट्टीकर कृत अभंग ५०
४१) श्रीसंत तात्यासाहेबमहाराज कोटणीस कृत अभंग ५६
४२) श्रीसंत गोपाळकाका कोटणीस कृत अभंग ५८
४३) श्रीसंत दादामहाराज कोटणीस कृत अभंग ५८
४४) श्रीगुरुलिंगगीतेतील अभंग ६०
४५) श्रीसंत मामामहाराज केळकर कृत अभंग ६२
४६) ती.मातोश्री सौ.इंदिराबाई केळकर कृत अभंग ६४
४७) श्रीसंत दासराममहाराज केळकर कृत अभंग ६६
४८) श्रीसंत स्वामीसूतमहाराज कृत अभंग ७१
४९) श्रीसंत तुकडोजीमहाराज कृत अभंग ७१
५०) श्रीसंत नानामहाराज बर्वे कृत अभंग ७२
५१) श्रीसंत ब्रह्मानंदमहाराज बेलधडीकर कृत अभंग ७२
५२) श्रीसंत गजाननमहाराज अक्कलकोट कृत अभंग ७२
५३) श्रीसंत स्वामी स्वरूपानंदमहाराज कृत अभंग ७३
५४) श्रीसंत साधुदास कृत अभंग ७३
५५) श्रीसंत कृष्णतनय कृत अभंग ७४
५६) श्रीसंत रंगनाथस्वामी कृत अभंग ७५
श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प यादी...................... ७६
सूची .................................................. ७७
श्रीदासराममहाराजांची आरती ...................... ८०

## श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराज कृत अभंग

(१)

रूप पाहता लोचनी ।। सुख झाले हो साजणी ।।१।।
तो हा विठ्ठल बरवा ।। तो हा माधव बरवा ।।२।।
बहुता सुकृताची जोडी ।। म्हणुनी विठ्ठल आवडी ।।३।।
सर्व सुखाचे आगर ।। *बापरखुमादेवीवर* ।।४।।

(२)

गुरू हा संतकुळीचा राजा । गुरू हा प्राणविसावा माझा ।
गुरूवीण देव दुजा । पाहतां नाहीं त्रिलोकी ।।१।।

गुरू हा सुखाचा सागरू । गुरू हा प्रेमाचा आगरू ।
गुरू हा धैर्याचा डोंगरू । कदाकाळी डळमळीना ।। २।।

गुरू वैराग्याचे मूळ । गुरू हा परब्रह्म केवळ ।
गुरू सोडवी तात्काळ । गाठ लिंगदेहाची ।।३।।

गुरू हा साधकाशी साह्य । गुरू हा भक्तालागी माय ।
गुरू हा कामधेनु गाय । भक्तांघरी दुभतसे ।।४।।

गुरू घाली ज्ञानांजन । गुरू दाखवी निजधन ।
गुरू सौभाग्य देऊन । साधुबोध नांदवी ।।५।।

गुरू मुक्तीचें मंडन । गुरू दुष्टांचें दंडन ।
गुरू पापाचें खंडन । नानापरी वारितसे ।।६।।

काया काशी गुरू उपदेशी । तारक मंत्र दिला आम्हाशीं ।
*बापरखुमादेवीवराशी* । ध्यान मानसीं लागले ।।७।।

(३)

कसा मला तारील पंढरीराव ! ।।ध्रु।।
भाव कळेना भक्ती घडेना । उगाच म्हणे मला पाव ।।१।।
आत्मरूपाने वर्ते शरीरी । उगाच धावाधाव ।।२।।
*ज्ञानदेव* म्हणे तोचि चराचरी । न कळे त्याची माव ।।३।।

(४)

हरि आला रे हरि आला रे । संतसंगे ब्रह्मानंदु जाला रे ।।ध्रु।।
हरि येथे हरि तेथे रे । हरिवांचूनि न दिसे रिते रे ।।१।।
हरि पाही रे हरि ध्याई रे । हरि वांचूनि दुजे नाही रे ।।२।।
हरि वाचे रे हरि नाचे रे । हरि पाहता आनंदु सांचे रे ।।३।।
हरि आदी रे हरि अंती रे । हरि व्यापक सर्वाभूती रे ।।४।।
हरि जाणा रे हरि वाना रे । *बापरखुमादेवीवरु* राणा रे ।।५।।

(५)

कैसें बोटानें दाखवूं तुला । पाहें अनुभव गुरुच्या मुला ।
नको सोडूं देठींच्या मुळा । सोडीं अंजुळी आपुल्या कुला रे ।।१।।
ज्या ठायी चळ ना ढळ । विश्व जयाचे सत्तेनें खेळ ।
अणु रेणु व्यापक सकळ । तेथे चळ ना अचळ रे ।।२।।
जेथे डोळिया दृष्टी पुरेना । तेथे वृत्तीचे काही चालेना ।
तेथे बुद्धीचा रीघ होईना । तेथे मनाची धांव पुरेना गा ।।३।।
काय पाहशी तुं भोंवतें । येतां जातां जवळी असतें ।
तुझ्या पाया खाली तुडवते । तुझ्या डोळ्यामध्यें दिसतें गा ।।४।।
ही खुण त्वां ओळखुनी घ्यावी । गुरूपुत्रा जाउनी पुसावी ।
तो नेऊनी तुला दाखवी । सोय सांगितली *ज्ञानदेवी* गा ।।५।।



(६)

देव देव म्हणुनी व्यर्थ का फिरसी । निजदेव नेणसी मूळी कोण ।।ध्रु।।
देवा नाही रूप देवा नाही नाम । देवा नाही गाव कोठे काही ।।१।।
*ज्ञानदेव* म्हणे भजा आत्मदेवा । अखंडित सेवा करा त्याची ।।२।।

(७)

आनंदु रे आजि परमानंदु रे । सबाह्य अभ्यंतरी अवघा गोविंदु रे ।।१।।
एक दोन तीन चार पांच आणि सहा । इतकी यांचा विचार करूनी परमानंदी रहा ।।२।।
सातवा अवतार आठवा वेळोवेळा । बापरखुमादेविवरु विठ्ठल जवळा ।।३।।

## श्रीसंत निवृत्तिनाथमहाराज कृत अभंग

(८)

फळले भाग्य माझे । धन्य झालों संसारी ।
सद्गुरू भेटला हो । तेणे धरियेले करी ।
पश्चिमेसि चालवीले । आत्मस्तुति निर्धारी ।
त्रिकूटावरि नांदे । देखियेली पंढरी ।।१।।
ते सुख काय सांगू । वाचे बोलतां नये ।
आरतीचेनि गूणें । गेले मीपण माझे ।।ध्रु।।
राऊळामाजि जाता । राहे देहअवस्था ।
मन हे उन्मन झाले । नसे बद्धतेची वार्ता ।
हेतु हा मावळला । शब्दा आली निःशब्दता ।
तटस्थ होउनि ठेले । निजरूप पाहातां ।।२।।
आनंदसागरांत । प्रेमे बुडी दीधली ।
लाणलें सौख्य मोठे । नये बोलतां बोली ।
सद्गुरूचेनि संगे । ऐसी आरती केली ।
*निवृत्ति* आनंदाने । तेथे प्रवृत्ति निमाली ।।३।।

## श्रीसंत मुक्ताबाई कृत अभंग

(९)

उलट उलट माघारा गडीया फिरगोते खासी ।
भरला पूर मायेचा लोंढा वाहूनिया जाशी ।।ध्रु।।
या भवनदीचे पाणी रे गडीया मोठे ओढीते ।
भल्या भल्या पोहणाऱ्यांना उलटूनि पाडिते ।।१।।
अविद्येचा पूर बाबा वेगी ओसरेना ।
कल्पना सुसरीची मिठी सुटेना ।।२।।
क्षणभंगुर संसार याचा भरवसा नाही ।
नरतनु गेल्या बारे मग तू पडशील पस्ताई ।।३।।
म्हणे *मुक्ताबाई* चांग्या अंतरीची खूण ।
धरी सद्गुरुचे पाय तूला नेती उतरून ।।४।।

(१०)

निर्गुणाचा संग मला आजि लाभला ।
पूर्व दिशे भानु जसा आंत उगवला ।।ध्रु।।
दर्पणात दीप जसे तेज देखिले ।
पंचभूत प्रपंचि फार पीडिले ।।१।।
काम क्रोध सर्व कर्म दंडिले बळे ।
सूत्र धरूनि मध्यभागी वरि चालिले ।।२।।
त्रिवेणीचा ओघ तेथे अंग धूतले ।
अनुहात झणझणात नाद ऐकिले ।।३।।
सहस्रदळी अढळपदी पुरुष पाहिले ।
दिव्य स्फटिक मंदिरात त्यासि भेटिले ।।४।।
म्हणे *मुक्ताबाई* आतां बोल राहिला ।
पहा ठाई ठाई तोचि उभा ठाकला ।।५।।



## श्रीसंत एकनाथमहाराज कृत अभंग

(११)

लंबोदर गिरिजानंदना । पूर्ण करी मनकामना ।।ध्रु।।
हे मनभवना तव पदसेवना । विद्या द्यावी गजानना ।।१।।
*एका जनार्दनी* विनवितो तुज । बुद्धी द्यावी गजानना ।।२।।

(१२)

कशास जावे दूर । माझे येथेचि पंढरपूर ।।ध्रु।।
अणु-रेणु-व्यापक विठ्ठल अवघा, काय म्हणावा दूर ।।१।।
भक्तिभीमातीर भाव पुंडलीक, आत्मा विठ्ठल धुर ।।२।।
विठ्ठलस्मरणी विठ्ठल झालो, नाही मना हूरहूर ।।३।।
*एका-जनार्दनी* सद्गुरुबोधे । भलते ठायी निसूर ।।४।।

(१३)

सगुण चरित्रें परम पवित्रें हरिची वर्णावी ।
सज्जनवृंदे मनोभावानें आधी वंदावी ।।ध्रु।।
संतसंगे अंतररंगे नाम बोलावें ।
कीर्तनरंगी देवासंनिध सुखेचि डोलावे ।। सगुण०।।१।।
भक्तिज्ञानाविरहित गोष्टी इतरा न कराव्या ।
प्रेमभरे वैराग्याच्या युक्ती विवराव्या ।। सगुण०।।२।।
जेणें करुनी मूर्ति ठसावी अंतरि श्रीहरिची ।
ऐशी कीर्तनमर्यादा ही देवाचे घरची ।। सगुण०।।३।।
अखंडस्मरणे अद्वयभजने वाजवि करताळी ।
एका *जनार्दनी* मुक्ती होय तत्काळी ।। सगुण०।।४।।

(१४)

मन रामी रंगले । अवघे मनचि राम झाले ।
सबाह्यअभ्यंतरी अवघे रामरूप कोंदले हो ! ।।ध्रु।।
आत्मया रामाचे ध्यान लागले मज कैसे हो ? ।
क्रियाकर्मधर्म अवघे तेणेचि प्रकाशे हो ! ।
सत्य मिथ्या प्रकृती पुरूष रामचि अवझा भासे हो ! ।। मन०।।१।।
चित्तचि हारपले अवघे चैतन्य जाहले हो ! ।
देखतां देखतां अवघे विश्व मावळले हो ! ।
पाहातां पाहाणेपणा हरिला, सर्वस्वे ठकवीले हो ! ।। मन०।।२।।
भक्ति ज्ञान वैराग्य लाभे आत्मस्थिती हो ! ।
निर्धारिता नकळे रामरूपी जडली प्रीति हो ! ।
एका *जनार्दनी* अवघा रामचि आदिअंती हो ! ।। मन०।।३।।

(१५)

झालि संध्या, संदेह माझा गेला । आत्माराम ह्रदयी प्रगटला ।।ध्रु।।
गुरुकृपा निर्मळ भागीरथी । शांति क्षमा यमुना सरस्वती ।
असिपदी एकत्र जेथे होती । स्वानुभवे स्नान हेचि गुप्त स्थिती ।।१।।
सद्बुद्धीचे घातले शुद्धासन । वरी दया सद्गुरुची कृपा पूर्ण ।
शमदम आंगी विभुती चर्चिले जाण । मुखी उच्चारी केशव नारायण ।।२।।
बोध पुत्र निर्माण झाला जेव्हा । ममता म्हातारी मरोन गेलि तेव्हा ।
भक्ति बहिण धावोनी आली गावा । आता संध्या करू मी कैंची केव्हा ।।३।।
कर्माकर्मे ती जाली कृष्णार्पण । ऐसे ऐकता नीवती साधुजन ।
जन नव्हे अवघाचि जनार्दन । एका *जनार्दनी* लाधली हेचि खूण ।। ४।।



(१६)

निंदक कामाचा कामाचा । गडी आत्मारामाचा ।।ध्रु।।
निंदक आमुची काशी । आमुची पातके अवघी नाशी ।। निंदक०।।१।।
निंदक आमुचा सखा । आमुचीं वस्त्रे धूतो फुका ।। निंदक०।।२।।
निंदक आमुची गंगा । आमची पातके नेते भंगा ।। निंदक०।।३।।
निंदक आमुचा गुरु । एका *जनार्दन* थोरु ।। निंदक०।।४।।

(१७)

ते मन निष्ठुर कां केले । जें पूर्ण दयेनें भरले ।।ध्रु।।
गजेंद्राचे हाके सरसे । धाउनिया आले ।। ते०।।१।।
प्रल्हादाच्या भावासाठी । स्तंभी गुरगुरले ।।ते०।।२।।
पांचाळीच्या करुणावचने । कळवळुनि आले ।। ते०।।३।।
एका *जनार्दन* पूर्ण कृपेने । निशिदिनी पदि रमले ।। ते०।।४।।

(१८)

बा! रे! जन्मोनी केलेस काय? ।।ध्रु।।
घडि घडि पल पल वय हे जाते । व्यर्थ श्रमविली माय ।। बा०।।१।।
कोण कैसा तू आलास कोठून । हेचि मनि शोधुनी पाहे ।। बा०।।२।।
एका *जनार्दनी* शरण तू जाई । धरि सदा गुरुचे पाय ।। बा०।।३।।

(१९)

नित्य नवा कीर्तनी जैसा ओढवला रंग ।
श्रोता आणि वक्ता स्वये झाला श्रीरंग ।।ध्रु।।
आल्हादे वैष्णव करिती नामाचा घोष ।
हरिनाम गर्जती गगनी न समाये हर्ष ।। नित्य०।।१।।
पदोपदी कीर्तनी निवेदिती आहे जनवान ।
आवडी भुकेली तिणे गिळिले गगन ।। नित्य०।।२।।
एका *जनार्दनी* नित्य हरीचे कीर्तन ।
निमाले इंद्रिय विषया विसरले काम ।। नित्य०।।३।।

(२०)

अरे! गाढवाच्या लेका! । संसार गेला फुका ।।ध्रु।।

संतालागी नमन करिता लाज वाटे चित्ता ।
संतचरण नावडती, आवडती बायलेच्या लाथा ।। अरे!०।।१।।

अंतकाळी प्राण जातो, मरतो देतो तिडका ।
आमची पोरे भिउनि जातील तोड याचा झटका ।। अरे!०।।२।।

बारा सोळा पोरे झाली आल्या सुना नातू ।
लक्ष्मी तरी निघोन गेली कमरेवरी हातू ।। अरे!०।।३।।

कसे करू काय करू ऐसी करिसील चिंता ।
संतालागी विन्मुख होता लाभ नये हाता ।। अरे!०।।४।।

एका *जनार्दनी* म्हणे संसार हा खोटा ।
संतालागी शरण जाता तुझा नाही तोटा ।। अरे!०।।४।।

(२१)

मी आलो रायाचा जोशी । होरा ऐकशी ।।ध्रु।।

वासना बायको शेजारिण । झगडी कुटिल मोठी दारुण ।
तिचे पायी नागवण । घर बुडवीशी ।। मी आलो०।।१।।

येथून पुढे बरे होईल । भक्ती सुखे दोंद वाढेल ।
फेरी कर्माची खंडेल । धन्य मोकाशी ।। मी आलो०।।२।।

मनजी पाटील देहेगावीचा । विश्वास धरू नये तयाचा ।
घात करील नेमाचा । पाडील फशी ।। मी आलो०।।३।।

एका *जनार्दनी* जोशी । होरा सांगतो लोकासी ।
फेरी चुकवा चौऱ्याऐंशीची । शरण रिघालो संतासी ।।४।।



(२२)

गुरुकृपांजन पाये मेरे भाई! । रामबिना कछु जानत नाही ।।ध्रु।।
अंदर राम, बाहिर राम,। जहां देखो वहां पूरनकाम ।। गुरु०।।१।।
जागत राम सोवत राम । सपनेमे देखे राजा हि राम ।। गुरु०।।२।।
एका *जनार्दनी* भावही नीका । जहां देखो वहां रामसरीखा ।। गुरु०।।३।।

(२३)

आवडीनें भावे हरिनाम घेसी । तुझी चिंता त्यासी सर्व आहे ।।१।।
नको खेद करूं कोणत्या गोष्टीचा । पती लक्षुमीचा जाणतसे ।।२।।
सकळ जीवांचा करीतो सांभाळ । तुज मोकलील ऐसें नाही ।।३।।
जैसी स्थिती आहे तैशापरी राहे । कौतुक तूं पाहे संचिताचें ।।४।।
एका *जनार्दनी* भोग प्रारब्धाचा । हरिकृपें त्याचा नाश आहे ।।५।।

(२४)

नाम वदता हे वैखरी । चित्त धावे विषयांवरी ।।१।।
कैसे होताहे स्मरण । स्मरणामाजी विस्मरण ।।२।।
नामरूपा नाही मेळ । नुसता वाचेचा गोंधळ ।।३।।
एका *जनार्दनी* नाम । नामी प्रकटे आत्माराम ।।४।।

## श्रीसंत नामदेवमहाराज कृत अभंग

(२५)

अमृताहूनि गोड नाम तुझे देवा । मन माझे केशवा कां बा नेघे ।।१।।
सांग पंढरीराया काय करू यासी । कां रूप ध्यानासि नये तुझे ।।२।।
कीर्तनी बैसता निद्रे नागविले । मन माझे गुंतले विषयसुखा ।।३।।
हरिदास गर्जती हरिनामाच्या कीर्ति । तरी का नये चित्ती म्हणे *नामा* ।।४।।

(२६)

बोलू ऐसे बोल । जेणे बोले विठ्ठल डोले ।।१।।
प्रेम सर्वांगाचे ठायी । वाचे विठ्ठल रखुमाई ।।२।।
नाचूं कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावूं जगी ।।३।।
परेहुनि परते घर । तेथे राहूं निरंतर ।।४।।
सर्व सत्ता आली हातां । *नामयाचा* खेचर दाता ।।५।।

(२७)

वैष्णवां घरी सर्वकाळ । सदा झणझणिती टाळ ।।१।।
कण्या भाकरीचे खाणे । गांठी रामनाम नाणे ।।२।।
बैसावयासी कांबळा । द्वारी तुळसी रंगमाळा ।।३।।
घरी दुभे कामधेनु । तुपावरी तुळसी पानु ।।४।।
फराळासी पीठ लाह्या । घडी घडी पडती पायी ।।५।।
*नामा* म्हणे नेणती कांही । चित्त अखंड विठ्ठलपायी ।।६।।

(२८)

आकल्प आयुष्य व्हावे तयां कुळां । माझिया सकळां हरिच्या दासां ।।१।।
कल्पनेची बाधा न हो कोणे काळीं । हे संतमंडळी सुखी असो ।।२।।
अहंकाराचा वारा न लागो राजसां । माझ्या विष्णुदासां भाविकांसी ।।३।।
*नामा* म्हणे तया असावे कल्याण । ज्या मुखी निधान पांडुरंग ।।४।।

## श्रीसंत जनाबाई कृत अभंग

(२९)

खंडेराया तुज करिते नवस । मरूं दे सासूस खंडेराया ।।१।।
सासू मेल्यावरी तुटेल आसरा । मरूं दे सासरा खंडेराया ।।२।।
सासरा मेलिया होईल आनंद । मरूं दे नणंद खंडेराया ।।३।।
नणंद मरता होईन मोकळी । गळा घालीन झोळी भंडाराची ।।४।।
*जनी* म्हणे खंड्या अवघे मरूं दे । एकटी राहूं दे पायापाशी ।।५।।



(३०)

झडतो नामाचा चौघडा ।।ध्रु।।

धरा सतरांचा हो मेळा । कारखाना झाला गोळा ।
वाजविती आपुल्या कळा । प्रेमबळा आनंदे ।। झडतो०।।१।।

झडतो नामाचा चौघडा । ब्रह्मीं ब्रह्मरूपीचा हुडा ।
संत ऐकताती कोडा । प्रेमबळा आनंदे ।। झडतो०।।२।।

*जनाबाई* घड्याळ मोगरी । घटका भरता टोला मारी ।
काळ व्यर्थची गेला तरी । गजर करी आनंदे ।। झडतो०।।३।।

(३१)

ये रे ये रे माझ्या रामराया वनबोरे ही द्यावीत खाया ।
भोळ्या शबरीची भोळी ही माया ।। ये रे ०।।१।।

क्षणाक्षणाला पाहीली वाट । कधी भेटेन जानकीनाथ ।
सोडुनिया काम मुखी रामनाम । कधी पाहीन डोळे भरूनीया ।।२।।

रानफूलांचा रंगित हार । माझ्या रामाला शोभे तो फार ।
राम राजयोगी वनवास भोगी । पाणी डोळ्यात भरुनीया ।।३।।

माझ्या मनाला तुझाची छंद । आजी आलासी झाला आनंद ।
तुझ्यासाठी देवा जमविला मेवा । रानावनात हिंडुनीया ।।४।।

फळा फळाला माझेची दात । नाही संशय माझ्या मनात ।
माझा भोळाभाव हा तुला ठाव । घ्यावी सेवा गोड करुनिया ।
दासी *जनी* लागतसे पाया । ये रे ये रे माझ्या रामराया ।। ५।।

## श्रीसंत तुकाराममहाराज कृत अभंग

(३२)

आधी गुरूसी वंदावे । मग साधन साधावे ।।ध्रु।।
गुरू म्हणजे आहे काशी । सर्व तीर्थे पायापाशी ।।१।।
गुरू म्हणजे मायबाप । पाय धरिता हरतील पाप ।।२।।
तुका म्हणे ऐसे गुरू । पाय त्यांचे हृदयी धरू ।।३।।

(३३)

देवा आता ऐसा करी उपकार । देहाचा विसर पाडी मज ।।१।।
तरीच हा जीव सुख पावे माझा । बरे केशीराजा कळो आले ।।२।।
ठाव देई चित्ता राखे पायापाशी । सकळ वृत्तीशी अखंडित ।।३।।
आस-भय-चिंता-लज्जा-काम-क्रोध । तोडावा संबंध यांचा माझा ।।४।।
मागणे ते एक हेचि आहे आता । नाम मुखी संतसंग देई ।।५।।
*तुका* म्हणे नको वरपंग देवा । घेई माझी सेवा भावशुद्ध ।।६।।

(३४)

शरण शरण हनुमंता । तुज आलो रामदूता ।।१।।
काय भक्तीच्या त्या वाटा । मज दावाव्या सुभटा ।।२।।
शूर आणि धीर । स्वामीकाजी तूं सादर ।।३।।
*तुका* म्हणे रुद्रा । अंजनीचिया कुमरा ।।४।।

(३५)

रत्नजडित सिंहासन । वरी बैसले आपण ।।१।।
कुंचे ढाळिती दोही बाही । जवळी राही रखुमाई ।।२।।
तेथे नाना उपचारी । ऋद्धी सिद्धी ते कामारी ।।३।।
हाती घेवोनी पादुका । उभा बंदी जन *तुका* ।।४।।



(३६)

राम राम म्हणता जावा माझा प्राण । येवढें कृपादान तुमचें मज ।।१।।
नको विद्या-वय आयुष्य फारसे । नाही मज पिसे मुक्तिचेंही ।।२।।
नको धन मान न वाढो संतान । मुखी नारायण प्राण जावो ।।३।।
*तुका* म्हणे दीन काकुलती येतो । तुज आठवितो पांडुरंगा ।।४।।

(३७)

तमाशा संताघरी । निर्गुणपुरी ।।ध्रु।।
गावावर एक बाभुळ । खाली शेंडा वरती मूळ ।
खाली कळस वर देउळ । गत आहे न्यारी ।। तमाशा०।।१।।
फुला आधी गुंफिला तुरा । याचा अर्थ करी चातुरा ।
कोण पुरा असेल चतुर । खोविल शिरी ।। तमाशा०।।२।।
घोडा रोवुन बांधिला खुंट । नगाऱ्यावर चढविला उंट ।
कोण पुतळा असेल बळिवंत । अर्थ विचारी ।। तमाशा०।।३।।
दिवा वाऱ्या घालीतसे खेव । ह्याचा घ्याहो तुम्ही अनुभव ।
*तुका* वैकुंठीचा राव । गत आहे न्यारी ।। तमाशा०।।४।।

(३८)

कसि रे! विट जोडली पुंडलिका । मनी भाव धरूनिया निका ।।ध्रु।।
मायबापाची सेवा करूनी । विठ्ठल आणिला सखा ।। कसि रे०।।१।।
खांदी कावडी वाहे पाणी । एकनाथाचे फुका ।। कसि रे०।।२।।
भीमातिरी रहिवास केला । तुकी उतरला *तुका* ।। कसि रे०।।३।।

(३९)

पार्वतीवर । नमिला म्या शिव शंकर ।।ध्रु।।
शंभू कैलासशिखरी । पार्वती आदिमाया सुंदरी ।
बैसुनी शंकराचे शेजारी । जोडूनी कर ।। नमिला०।।१।।

गिरिजा पुसे शंकरासी । तरि मी काय होय तुम्हासी ।
शंकर म्हणे माता होशी । मी तुझा कुमर ।। नमिला०।।२।।
ऐकुनि बोलली गिरिजा । मी तरी तुमची आत्मजा ।
तुम्ही पिता शंभूराजा । माझे माहेर ।। नमिला०।।३।।
बोलिला नंदी ते अवसरी । ऐका म्हणे त्रिपुरारी! ।
गिरिजा शंकराची अंतुरी । तुम्ही भ्रतार ।। नमिला०।।४।।
बोलिले मग स्वामी कार्तिक । नंदि तुम्हासी काय ठाऊक? ।
गिरिजा भाची बहिणीची लेक । भाचरू थोर ।। नमिला०।।५।।
बोले वीरभद्र आपण । तुम्ही लबाड चौघेजण ।
गिरिजा शंकराची बहीण । नाते साचार ।। नमिला०।।६।।
ब्रह्मा विष्णु त्रिनयन । हे काय होती तिघेजण ।
*तुका* म्हणे द्यावे निवडून । तुम्ही चतुर ।। नमिला०।।७।।

(४०)

आनंदु रे! कि परमानंदु रे! । जया श्रुती नेती म्हणती गोविंदू ।।ध्रु।।
आम्हा विठोबाची वेढी आनंदू सदा ।
गाऊ नाचू वाजवू टाळी रिझवू गोविंदा ।।१।।
सदा सण सात आम्हा नित्य दिवाळी ।
आनंदे निर्भर आमुचा कैवारी बळी ।।२।।
तुका म्हणे नाही जन्ममरणाचा धाक ।
संतसनकादिक हें आमुचें कौतुक ।।३।।

(४१)

वेगें व्हावे सावधान गुरुपाय जोडा ।।ध्रु।।
सारासार करुनि विचार । मग करा कारभार ।
प्रपंचाचा लोभ फार । हळुहळू सोडा ।। वेग०।।१।।



कशासाठी तानमान । हालउनी गातां मान ।
नका फार ब्रह्मज्ञान । अभिमान सोडा ।। वेगें०।।२।।
घोका घोका पोथी पान । सारासार कार्यज्ञान ।
होउनिया समाधान । मग डोई बोडा ।। वेगें० ।।३।।
पांघरुनी भगवी शाटी । गुरुपदी कटाकटी ।
मोठी दावी हातवटी । बैसुनिया लोडा ।। वेगें० ।।४।।
दास *तुका* सांगे कानी । गोपाळभट उमजा मनी ।
गोपाळनाथ ध्यानीं मनी । बरे डोळे उघडा ।। वेगें० ।।५।।

(४२)

ज्याचे सुख त्याला सुख त्याला । काय असे भलत्याला ।।ध्रु।।
एक जेउनि तृप्त झाला । एक हाका मारी अन्नाला ।। ज्याचे०।।१।।
एक नदी उतरुनि गेला । एक हाका मारी तारूला ।। ज्याचे०।।२।।
एक मोक्षमार्गी गेला । एक अधोगती चालिला ।। ज्याचे०।।३।।
*तुका* वैकुंठासी गेला । हाका मारितो लोकाला ।। ज्याचे०।।४।।

(४३)

पोटापुरते देई । मागणे लइ नाही लइ नाही ।।ध्रु।।
पोळी साजुक अथवा शिळी । देवा! देई भुकेच्या वेळी ।।१।।
वस्त्र नवे अथवा जुने । देवा! देई अंग भरून ।।२।।
देवा! कळणा अथवा कोंडा । आम्हा देई भुकेच्या तोंडा ।।३।।
*तुका* म्हणे आता । नका करू पाया परता ।।४।।

(४४)

आम्ही गोंधळी गोंधळी । गोविंद गोपाळाचे मेळी ।।ध्रु।।
आमचा घालावा गोंधळ । वाजवी हरिनाम समूळ ।। आम्ही०।।१।।
दहा पांच घाला जेऊ। तुमच्या गोंधळाला येऊ।। आम्ही०।।२।।
काम क्रोध बकरी मारा । पुजा रखुमाईच्या वरा ।। आम्ही०।।३।।

गुण गाऊ चोडक्यासी ।चुकवू लक्ष चौऱ्यांसी ।। आम्ही०।।४।।
जेथे विठूचे राउळ । तेथे *तुकयाचा* गोंधळ ।। आम्ही०।।५।।

(४५)

देवा ऐके रे विनंति मज नको तुझी मुक्ती ।
तया इच्छागती हेचि सुख आगळे ।।ध्रु।।
या या वैष्णवाच्या घरी प्रेम सुख इच्छा करी ।
ऋद्धीसिद्धी द्वारी कर जोडुन तिष्ठती ।। ऐक०।।१।।
नको वैकुंठीचा वास तया सुखा असे नाश ।
अद्भूत हा रस कथाकाळी नामाच्या ।। ऐक०।।२।।
तुझ्या नामाचा महिमा तुज न कळे पुरुषोत्तमा! ।
*तुका* म्हणे आम्हा जन्म गोड यासाठी ।। ऐक०।।३।।

(४६)

सुंदर ते ध्यान उभे विटेवरी ।। कर कटावरी ठेवूनिया ।।१।।
मकर कुंडले तळपती श्रवणी ।। कंठी कौस्तुभमणी विराजित ।।२।।
तुळसी हार गळा कासे पीतांबर ।। आवडे निरंतर हेचि ध्यान ।।३।।
*तुका* म्हणे माझे हेचि सर्व सुख ।। पाहीन श्रीमुख आवडीने।।४।।

(४७)

साधकाची वृत्ती उदास असावी ।। उपाधी नसावी अंतर्बाह्य ।।१।।
लोलुपता काय निद्रेते जिंकावे ।। भोजन करावे परीमित ।।२।।
एकांती लोकांती स्त्रियासी भाषण ।। प्राण गेल्या जाण करू नये ।।३।।
संग सज्जनाचा उच्चार नामाचा ।। घोष कीर्तनाचा अहर्निशी ।।४।।
*तुका* म्हणे ऐशा साधनी जो राहे ।। तया ज्ञान लाहे गुरुकृपें ।।५।।



(४८)

गोविंद गोविंद । मना लागलिया छंद ।।१।।
मग गोविंद ते काया । भेद नाही देवा तया ।।२।।
आनंदले मन । प्रेमे पाझरती लोचन ।।३।।
*तुका* म्हणे आळी । जीवे नुरेचि वेगळी ।।४।।

(४९)

अनंत युगाचा देव्हारा । निजबोधाचा धूमारा ।
आंगी आउतिचा भरला वारा । या मल्हारी देवाचा ।। शुद्ध०।।१।।
शुद्ध सत्वाचा केवढा मोठा । बोध ब्रीद बांधिला गाठा ।
अंगी वैराग्याचा पटा । दावी वाटा भक्तीच्या ।। शुद्ध०।।२।।
उदर कोठे बा! संगाती । घोळ वाजवी अनुहाती ।
ज्ञान भंडाराचे पोते । रिते नव्हे कल्पांती ।। शुद्ध०।।३।।
लक्ष चौऱ्याऐशी घरे चारी । या या देवाची केली वारी ।
प्रसन्न झाले देव मल्हारी । सोहंभावे राहीलो ।। शुद्ध०।।४।।
या या देवाचे भरता वारे । गुरगुर करी वेडेचारे ।
आंगी प्रेमाचे फेपरे । दास *तुकया* भुंकेना ।। शुद्ध०।।५।।

(५०)

जे कां रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले ।।१।।
तोचि साधु ओळखावा । देव तेथेची जाणावा ।।२।।
मृदु सबाह्य नवनीत । तैसे सज्जनाचे चित्त ।।३।।
ज्यासी आपंगिता नाही । त्यासी धरी जो हृदयी ।।४।।
दया करणे पुत्रासी । तेचि दासा आणि दासी ।।५।।
*तुका* म्हणे सांगो किती । तोचि भगवंताची मूर्ती ।।६।।

(५१)

नमन माझे गुरूराया । महाराज दत्तात्रया ।।ध्रु।।
तुझी अवधूत मूर्ति । माझ्या जीवीची विश्रांती ।।१।।
माझ्या जीवीची काचणी । दूर करा चक्रपाणि ।।२।।
माझ्या जीवीचे साकडे । कोण उगवेल कोडे ।।३।।
बापा अनुसूयेच्या सुता । *तुका* म्हणे पाव आता ।।४।।

(५२)

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ ।।ध्रु।।
आईकाजी तुम्ही भक्त भागवत । कराल ते हित सत्य करा ।।१।।
कोण्याही जीवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर पूजनाचे ।।२।।
*तुका* म्हणे एका देहाचे अवयव । सुख दुःख जीव भोग पावे ।।३।।

(५३)

देऊळ बांधियले सुंदर । कलाकुसर चित्राकार ।
आधी पहावा तो कळस । पिका आला ब्रह्मरस ।।१।।
माळीये जे ऊते नेले । ते असे निवांतची गेले ।
हाचि ज्ञानेश्वरीचा कळस । पिका आला ब्रह्मरस ।।२।।
अहं सोहं राम रामाय । रामायणीचा जप पाहे ।
हाचि रामायणीचा कळस । पिका आला ब्रह्मरस ।।३।।
मुक्ती वरील गुरूभक्ती । उद्धव मागे अति प्रीति ।
हाचि भागवताचा कळस । पिका आला ब्रह्मरस ।।४।।
याची देही याची डोळा । भोगी मुक्तीचा सोहळा ।
हाचि विवेकसिंधुचा कळस । पिका आला ब्रह्मरस ।।५।।
अभंग शतकोट केले असे । करिता करिता राहीले शेष ।
*तुका* अवताराचा कळस । पिका आला ब्रह्मरस ।।६।।



(५४)

गुरूचरणी ठेवितां भाव । आपोआप भेटे देव ।।१।।
म्हणुनि गुरूसी भजावे । रूप ध्यानासी आणावे ।।२।।
गुरूपाशी आहे देव । वारंवार सांगू काय ।।३।।
*तुका* म्हणे गुरू-वचनी । देव भेटे जनी वनी ।।४।।

(५५)

सदा नामघोष करू हरी कथा । तेणे माझ्या चित्ता समाधान ।।ध्रु।।
सर्व सुख ल्यालो सर्व अलंकार । आनंदे निर्भर डुल्लतसे ।।१।।
असो ऐसा कोठे आठवची नाही । देहीच विदेही भोगू दशा ।।२।।
*तुका* म्हणे आम्ही झालो अग्निरूप । लागो नेदू पापपुण्य अंगा ।।३।।

(५६)

उजळले भाग्य आता । अवघी चिंता वारली ।।१।।
संतदर्शने हा लाभ । पद्मनाभ जोडला ।।२।।
संपुष्ट हे हृदयपेटी । करूनि पोटी सांठवू ।।३।।
*तुका* म्हणे होता ठेवा । तो या भावा सांपडला ।।४।।

(५७)

काय वानू मी या संतांचे उपकार । मज निरंतर जागविती ।।ध्रु।।
काय द्यावे यासी व्हावे उतराई । ठेवितो हा पायी जीव थोडा ।।१।।
सहज बोलणे हित उपदेश । करूनी सायास शिकविती ।।२।।
*तुका* म्हणे वत्स धेनुवेचे चित्ती । तैसे मज येती सांभाळीत ।।३।।

(५८)

अंतरी निर्मळ वाचेचा रसाळ । त्याचे गळा माळ असो नसो ।।१।।
आत्मानुभवी चोखाळिल्या वाटा । त्याचे माथा जटा असो नसो ।।२।।
परस्त्रीचे ठायी जो कां नपुंसक । त्याचे अंगा राख असो नसो ।।३।।
परद्रव्या अंध निंदेसी जो मुका । तोचि संत देखा *तुका* म्हणे ।।४।।

(५९)

पापाची वासना नको दावू डोळा । त्याहूनी आंधळा बराच मी ।।१।।
निंदेचे श्रवण नको माझे कानी । बधिर करोनी ठेवी देवा ।।२।।
अपवित्र वाणी नयो माझ्या मुखा । त्याजहुनी मुका बराच मी ।।३।।
नको मज कधी परस्त्रीसंगती । जनांतुनी माती उठतां भली ।।४।।
*तुका* म्हणे मज अवघ्यांचा कंटाळा । तूं एक गोपाळा आवडसी ।।५।।

(६०)

ब्रह्मरस घेई काढा । तेणे पीडा वारेल ।।१।।
पथ्य नाम विठोबाचे । आणिक जिव्हे न सेवी ।।२।।
भवरोगा ऐसे जाय । आणिक काय क्षुल्लके? ।।३।।
*तुका* म्हणे नव्हे बाधा । आणिक कदा भूतांची ।।४।।

(६१)

नामसंकीर्तन साधन पैं सोपे । जळतील पापे जन्मांतरिची ।।१।।
नलगे सायास जावे वनांतरा । सुखे येतो घरा नारायण ।।२।।
ठायीच बैसोनी करा एकचित्त । आवडी अनंत आळवावा ।।३।।
रामकृष्ण हरी विठ्ठल केशवा । मंत्र हा जपावा सर्वकाळ ।।४।।
यावीण आणीक नाही पै साधन । वाहातसे आण विठोबाची ।।५।।
*तुका* म्हणे सोपे आहे सर्वाहूनी । शहाणा तो धणी घेतो तेथे ।।६।।

(६२)

हेचि थोर भक्ती आवडती देवा । संकल्पावी माया संसाराची ।।१।।
ठेविले अनंते तैसेची रहावे । चित्ती असो द्यावे समाधान ।।२।।
वाहिल्या उद्वेग दुःखचि केवळ । भोगणे ते फळ संचिताचे ।।३।।
*तुका* म्हणे घालू तयावरी भार । वाहू हा संसार देवापायी ।।४।।



(६३)

रामनामाचे पोवाडे । नित्य ज्याची वाचा पढे ।।१।।
धन्य तो एक संसारी । रामनाम जो उच्चारी ।।२।।
रामनाम गर्जे वाचा । काळ आज्ञाधारक त्याचा ।।३।।
*तुका* म्हणे रामनामी । कृतकृत्य झालो आम्ही ।।४।।

(६४)

जेथे कीर्तन करावे । तेथे अन्न न सेवावे ।।१।।
बुका लावू नये भाळा । माळ घालूं नये गळा ।।२।।
तट्टावृषभासी दाणा । तृण मागो नये जाणा ।।३।।
*तुका* म्हणे द्रव्य घेती । देती तेही नरका जाती ।।४।।

(६५)

देव माझा मी देवाचा । ऐसी माझी सत्य वाचा ।।ध्रु।।
देह देवाचे देऊळ । आत बाहेर निर्मळ ।।१।।
देव पहावया गेलो । तव तो अंगे देवचि झालो ।।२।।
*तुका* म्हणे धन्य झालो । आजि विठ्ठला मिनलो ।।३।।

(६६)

शेवटची विनवणी । संतजनी परिसावी ।।१।।
विसर तो न पडावा । माझा देवा तुम्हासी ।।२।।
आता फार बोलो काय । अवघे पाया विदित ।।३।।
*तुका* म्हणे पडतो पाया । करा छाया कृपेची ।।४।।

## श्रीनिळोबाराय कृत अभंग

(६७)

नाम वाचे श्रवण कीर्ती । पाउले चित्ती समान ।।१।।
काळ सार्थक केला त्यांनी । धरिला मनी विठ्ठल ।।२।।

कीर्तनाचा समारंभ । निर्दंभ सर्वदा ॥३॥
*निळा* म्हणे स्वरूप सिद्धी । नित्य समाधि हरिनाम ॥४॥

(६८)

माझ्या सद्‌गुरूंची पाऊले गोमटी । वंदिताची भेटी हृदयस्था ॥ध्रु॥
सद्‌गुरू सद्‌गुरू करिता उच्चारु । येती हरिहरू भेटावया ॥१॥
माझ्या सद्‌गुरूंचे अवलोकिता मुख । समाधीचे सुख तुच्छ वाटे ॥२॥
*निळा* म्हणे माझ्या सद्‌गुरूंची मूर्ती ।आहे ते विश्रांती विश्रांतीची ॥३॥

## श्रीसंत चोखामेळा कृत अभंग

(६९)

ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा । काय भुललासी वरलिया रंगा ॥१॥
कमान डोंगी परी तीर नोहे डोंगा । काय भुललासी वरलिया रंगा ॥२॥
नदी डोंगी परी जळ नोहे डोंगे । काय भुललासी वरलिया रंगे ॥३॥
चोखा डोंगा परी विठ्ठल नोहे डोंगा । काय भुललासी वरलिया रंगा ॥४॥

## श्रीसमर्थ रामदासस्वामी कृत अभंग

(७०)

कल्याण करी रामराया । जनहित विवरी ॥ध्रु॥
तळमळ तळमळ होतचि आहे । हे जन हाती धरी ॥१॥
अपराधी जन चुकतचि गेले । तुझा तूचि सावरी ॥२॥
कठिण त्यावरी कठिण जाले । आता न दिसे उरी ॥३॥
कोठे जावे काय करावे । आरंभिली बोहरी ॥४॥
*दास* म्हणे आम्ही केले पावलो । दयेसी नाही सरी ॥५॥



(७१)

जेणे राम देखिला माझा, देखिला माझा । त्याची पायवणी मज पाजा ॥१॥
जेणे राम देखिला डोळा, देखिला डोळा । त्याचे पद लागो मम भाळा ॥२॥
जेणे राम देखिला दृष्टी, देखिला दृष्टी । त्याची माझी घडो दे भेटी ॥३॥
जेणे राम देखिला नयनी, देखिला नयनी । *रामदास* लोटांगणी ॥४॥

(७२)

नवमी करा नवमी करा । नवमी करा भक्ति नवमी करा ॥ध्रु॥
अष्टमीपरी नवमी बरी । तये दुसरी न पवे सरी ॥ नवमी०॥१॥
भेद हा तुटे अभेद ऊमटे । राम प्रगटे तेचि नवमी ॥ नवमी०॥२॥
शीघ्र नवमी येतसे उर्मी । *रामदास* मी अर्पिली रामीं ॥ नवमी०॥३॥

(७३)

कैवारी हनुमान आमुचा । कैवारी हनुमान ॥ध्रु॥
पाठी असता तो जगजेठी । वरकड काय गुमान ॥१॥
नित्य निरंतर भजता रक्षी । धरोनिया अभिमान ॥२॥
*दासा* रक्षिल हाची भरवसा । वदतो त्याची आण ॥३॥

(७४)

अमृत-संजीवनी । नाम तुझे अमृत-संजीवनी ॥ध्रु॥
सकल-मंगल-निधी, सर्व-कार्य-सिद्धी । तरणोपाय जनी ॥१॥
आगम निगम, संतसमागम । वेधले देव मुनी ॥२॥
*दास* म्हणे करुणा-घन पावन । तारक त्रिभुवनी ॥३॥

(७५)

त्या देवाचे दर्शन तू घे तू घे । संसार-मोहांतुनि निघे निघे ॥ध्रु॥
आदि मध्य ना अंत जयाला । ज्यापासुनि ओंकारचि झाला ॥
नेति नेति म्हणे श्रुति जयाला । ब्रह्मा विष्णू हर तिघे ॥१॥

अगम्य अगोचर सत्ता ज्याची । सहज लीळा ही त्याची रे ।।
स्वेदज अंडज जारज उद्भिज । ज्या प्रभुपासुनि हे निघे ।।२।।
सकहहि दृश्या टाकुनि पाहता । निरालंबि हा राहतो रे ।।
प्राणापान ऊर्ध्वचि वाहता । आनंदभुवनी मन हे रिघे ।।३।।
*रामदास* म्हणे शून्याकार । रूप नाही त्यास आकार ।।
परब्रह्म ते निर्विकार । अंतर बाहेर हे अवघे ।।४।।

(७६)

कोण मी मज कळतची नाही । सारासारविचार शोधुनी पाही ।।ध्रु।।
नर म्हणो तरी नारीची भासे । नारी म्हणो तरी समूळ विनासे ।।१।।
*दास* म्हणो तरि रामचि आहे । राम म्हणो तरि नाम न साहे ।।२।।

(७७)

घटका गेली पळे गेली तास वाजे झणाणा ।
आयुष्याचा नाश होतो राम कां रे! म्हणाना? ।।ध्रु।।
एक प्रहर दोन प्रहर तीन प्रहर गेले ।
विषयाच्या संगामुळे चारी प्रहर गेले ।। घटका०।।१।।
रात्र काही झोप काही स्त्रीसंगे गेली ।
ऐशी आठा प्रहरांची वासलाद झाली ।। घटका०।।२।।
*दास* म्हणे तास वाजे सकळ स्मरण देतो ।
वेळोवेळी सावध रहा म्हणोनि झणकारितो ।। घटका०।।३।।

(७८)

जाजा जाजा तुम्ही झटका रे! । गुरुपदि जाउनि हटका रे! ।।
घ्या रामरसाचा घुटका प्राण्या । तरीच होइल सुटका रे! ।।ध्रु।।
औट हाताचा मळा रे!। राबती बारा सोळा रे! ।।
विधातियाने जप मांडिला । अमृताची वेळा रे! ।। जाजा०।।१।।



नऊ दरवाजे खिडकी रे! । षडचक्रावर फिरकी रे ! ।।
तेथेच प्राण्या खाऊन गिरकी! । चिन्मय स्वरूप वोळखी रे! ।। जाजा०।।२।।
असाच होशी धीट रे! । पाहे उलट्या नीट रे! ।।
*रामदास* तुज स्पष्ट सांगतो । मोक्षपदाची वाट रे! ।। जाजा०।।३।।

(७९)

प्रपंच पडदा पडली झापड, राम दिसेना डोळा रे! ।।ध्रु।।
दिवसा निजू निजू रात्री निजू निजू । निज निज व्यर्थचि गेले रे! ।। १।।
दिवसा झोपी रात्री झोपी । झोपेने दिधला टोला रे! ।।२।।
*रामदास* म्हणे काही नाही केले । आयुष्य व्यर्थचि गेले रे! ।।३।।

(८०)

मायारे अनिवार ।। हरि तुझी ०।।ध्रु।।
षड्रिपु वैरी मजला गांजिती ।। कसा तरेन भवपार ।।हरि०।।१।।
पाहू जाता अंत न लागे ।। शेषहि थकला फार ।। हरि०।।२।।
बाळकृष्णा कृपा करावी ।। *दास* विनवी वारंवार ।। हरि०।।३।।

(८१)

किती एक येती किती एक जाती । नाही जीवाची गणती रे ।
सद्गुरु चरणी शरण जे जाती । होय तयाची महती रे ।। ध्रु ।।
ग्रंथ वाचिले ज्ञान मिळविले । अभिमानाने फुगले रे ।
सद्गुरुवाचुनी गुज कळेना । ब्रह्मसुखाला मुकले रे ।। १।।
बाईल केली संतती झाली । संपत्ती घरासी आली रे ।
हरिभजनाविण जीवंत राहून । मसलत सारी फसली रे ।।२।।
*दास* म्हणे रे पाही विचारूनी । न रमे कोणी हरिभजनी ।
परमार्थाचे लक्षण काही । देही दिसेना या अजुनी ।।३।।

(८२)

राम गावा राम घ्यावा । राम जीवीचा विसावा ।।१।।
कल्याणाचें जे कल्याण । रघुरायाचे गुणगान ।।२।।
मंगळाचे जें मंगळ । राम कौसल्येचा बाळ ।।३।।
राम कैवल्याचा दानी । रामदासा अभिमानी ।।४।।

(८३)

आम्ही काय कुणाचे खातो रे । तो राम आम्हाला देतो रे ।।ध्रु।।
बांधिले घुमट किल्याचे तट । तयाला फुटती पिंपळवट ।
तेथे कोण लावितो मोट । बुडाला पाणि घालीतो?।।१।।
खडक फोडिता सजिव रोडकी । पाहिली सर्वांनि बेडकी ।
सिंधु नसता तियेचे मुखी । पाणी कोण घालीतो? ।।२।।
पहा रे पहा मातेचीये स्तनी । चिंतिता रक्तमांसमलखाणी ।
तिथे विमल दुग्ध घालोनी । कोण पोसीतो? ।।३।।
नसता पाण्याचे बुडबुडे । सदासर्वदा गगन कोरडे ।
*दास* म्हणे जीवन चहूंकडे । पाडुनि सडे पीक उगवीतो? ।।४।।

(८४)

आम्ही अपराधी अपराधी । आम्हा नाही दृढ बुद्धि ।।१।।
माझे अन्याय अगणित । कोण करील गणित ।।२।।
ब्रीद आपुले राखावे । प्रचीतीने सांभाळावे ।।३।।
माझी वाईट करणी । *रामदास* लोटांगणी ।।४।।

(८५)

रामा हो जयरामा । पतीतपावन पूर्णकामा हो ।।१।।
नाथा हो दिनानाथा । चरणी लागो तुमच्या माथा हो ।।२।।
बंधु हो दिनबंधु । *रामदास* म्हणे कृपासिंधू हो ।।३।।



## श्रीसंत वेणाबाई कृत अभंग

(८६)

नमो रामराया । नमो रामराया । येऊ दे सदया । करुणा माझी ।।ध्रु।।
अखंडित मन । जडो तुझे पायी । देशील तरी देई । वर हाची ।।१।।
तुजविण क्षण । न जावो सर्वथा । हेचि गा समर्था । मागतसे ।।२।।
हीन, दीन *वेणी* । चरणी शरण । होऊनी अनन्य । मागतसे ।।३।।

## श्रीसंत कबीरसाहेब कृत अभंग

(८७)

सीताराम कहोजी मनमो । जबलग श्वास चला तनमो ।।ध्रु।।
एक दिन खावे दूध मलिदा । एक दिन शक्कर पूरी ।
एक दिन ऐसी आन पडे तो । नही पिसनेकू ज्वारी ।।१।।
एक दिन ओढे शाल दुशाला । एक दिन सफेद कंधी ।
एक दिन ऐसी आन पडे तो । नही अंगपर चिंधी ।।२।।
एक दिन हाथी एक दिन हौदा । एक दिन चढते घोडा ।
एक दिन ऐसी आन पडे तो । नही पाँवमो जोडा ।।३।।
कहत *कबीरा* सुनो भाई साधु । राम नाम कहो गद्धे ।
रामनामका डंका बाजे । जब चाहे सो लद्धे ।।४।।

(८८)

गुरुबिन कौन बतावे वाट । बडा बिकट जमघाट ।।ध्रु।।
भ्रांतिकी बाडी नदियां बिचमो । अहंकारकी लाट ।।१।।
मदमत्सरकी धार बरसत । माया पवन घनदाट ।।२।।
काम क्रोध दो पर्वत ठाडे । लोभ चोर संगात ।।३।।
कहत *कबिरा* सुन मेरे गुनिया । क्यौं करना बोभाट ।।४।।

(८९)

अल्ला तेरे दर्गाम्याने जाना है जरूर । मौला तेरे दर्गाम्याने जाना है जरूर ।।ध्रु।।
मंदिर माडी हम नही चाहत । अल्ला तेरी झोपंडी है रे कबूल ।।१।।
दूधमलीदा कछु नहिं चाहत । अल्ला तेरा टुकडा है रे कबूल ।।२।।
शाल दुशाला कछु नहिं चाहत । अल्ला तेरी गोधडी है रे कबूल ।।३।।
कहत *कबीरा* सुन भाई साधू । अल्ला तेरी नौकरी है रे कबूल ।।४।।

(९०)

संगत संतनकी करले ।। जनमका सार्थक कछु करले ।।संगत०।।ध्रु।।
उत्तम नरदेह पाया प्राणी ।। इसका हिम कछु करले ।।
सद्‌गुरुकूं शरणजाके बावा ।। जनमरण दुर करले ।। संगत०।।१।।
कहांसे आया कहांसे जावे ।। ये कछु मालुम करले ।।
दो दिनकी जिंदगानी बंदे ।। हुशार होकर चल रे ।। संगत०।।२।।
कोन किसीके जोरूर लडके ।। कोन किसीके साले ।।
जबलग अपने पल्लव वाढत ।। तबलग मीठा बोले ।। संगत०।।३।।
कहत *कबीरा* सुनभाई साधु ।। बारबार नही आना ।।
आपना हित कछु करले प्यारे ।। आखर अकेला जाना ।। संगत०।।४।।

(९१)

नजर न आवे आतम जोती ।।ध्रु।।
तेल न बत्ती बुझ नहिं जाती ।। नहि जागत नहि सोती ।।न०।।१।।
झिलमिल झिलमिल निसिदिनि चमके ।। जैसा निर्मल मोती ।। न०।।२।।
कहत *कबीरा* सुनभाई साधु ।। घरघर बांचत पोथी ।। न०।।३।।

(९२)

जग रूठे तो रूठत दे सब । अब मत रूठो मेरे रामजी ।।१।।
कल्पतरूने छाया किया । और वृक्षनका क्या कामजी ।।२।।
कामधेनुने दूध पिलाया । और गवनका क्या कामजी ।।३।।
कहत *कबीरा* आत्मतीर्थ नहावे । और तीर्थनका क्या कामजी ।।४।।



## श्रीसंत केशवस्वामी कृत अभंग

(९३)

तो मज अठवितो । गुरुराजा । प्राणविसावा माझा ।।ध्रु।।
श्रवणी पाजुनिया । अमृत । मस्तकी ठेवुनि हस्त ।।१।।
विवेक सिंधूची । चिद्रत्ने । लेवविली मज यत्ने ।।२।।
अखंड देउनिया । स्मरणासी । द्वैतभयाते नासी ।।३।।
अक्षय प्राप्तीचा सुखदाता । *केशव* म्हणे आता ।।४।।

(९४)

आनंद केला बा, गुरुराया । हरली अवघी माया ।।ध्रु।।
त्रिपुटी नासुनिया, सुख देसी । प्राणविसावा होशी ।।१।।
चिंता ममता ही, तव नेणे । ब्रह्मचि एक मी जाणे ।।२।।
*केशव* दातारा, सुखसारा । स्वरूपी दिधला थारा ।।३।।

(९५)

या या गुरुला काय म्यां द्यावे । यासी उतराई कैसेनि व्हावे ।।ध्रु।।
ज्ञानबोधाची दिवटी लावी । देव प्रत्यक्ष नयनी दावी ।।१।।
सत्य स्वरूप लोपले होतें । तें म्यां पाहिले गुरुचेनि हाते ।।२।।
*केशवस्वामी* दयाळू खरा । तेणे दावियले विश्वंभरा ।।३।।

(९६)

म्हणा श्रीराम जय जयराम । भवसिंधु-तारक नाम ।।ध्रु।।
नामापरते नाहीं सार । तरले नामेंचि अपार ।।१।।
नाममात्रेचिं केवळ । उद्धरिला अजामेळ ।।२।।
व्यास वाल्मीक अंबऋषि । नामे झाला उद्धार त्यांसि ।।३।।
सद्‌गुरु कृपे *केशविं* राम । म्हणता स्वयेचि झाला राम ।।४।।

(९७)

सुख आले सुखा । तुम्ही राम लुटा फुका ।।ध्रु।।
लुट मोठी पाही । तंव घेणार कोणी नाही ।। सुख०।।१।।
ज्ञानगर्वे जाता । तंव लुट नये हाता ।। सुख०।।२।।
*केशव* म्हणे उठा । तुम्ही साधुसंग लुटा ।। सुख०।।३।।

(९८)

आता मी नये बाई ! नये बाई ! । पुनरपि या संसारा ।।ध्रु।।
प्रपंच घरधणी घरधणी । वाईट याची करणी ।। आता०।।१।।
सासरा अहंकार अहंकार । जळो याचे घर ।। आता०।।२।।
सासू कल्पना कल्पना । जाच ईचा सोसेना ।। आता०।।३।।
काम क्रोध हे दिरभावे । जाच किती सोसावे? ।। आता०।।४।।
तृष्णा नणदुली नणदुली । वाईट ईची बोली ।। आता०।।५।।
*केशवस्वामीची* निजदासी । जाइन त्याचे पासी ।। आता०।।६।।

(९९)

स्वयं ब्रह्म जो आपणचि झाला । देव मस्तकी वंदिती त्याला ।।ध्रु।।
ज्याच्या दृष्टीसि सृष्टी नाही । देही असोनि पूर्ण विदेही ।। स्वयं०।।१।।
जेथे जाणीव नेणीव नाही । तेथे काहीच उरले नाही ।। स्वयं०।।२।।
ब्रह्म होऊनि ब्रह्मी जो खेळे । *केशव* त्याचे चरणी लोळे ।। स्वयं०।।३।।

(१००)

वेडियाच्या गावा गेलो । आम्ही वेडे होउनि आलो ।।ध्रु।।
आता बोलू नका काही । आम्हा माणूसपण नाही ।। वेडि०।।१।।
कर्मवसन टाकुनि साचे । जगी उघडे होउनि नाचे ।। वेडि०।।२।।
*केशव* म्हणे जवळी याल । तरि तुम्हीच वेडे व्हाल ।। वेडि०।।३।।



(१०१)

त्याचे संगतिचा लागो मज वारा वो ! ।
तेणे सखिये ! पावेन पैल पारा वो ! ।।ध्रु।।
गुरुमज्जनी जीवनबिंदु उडे वो ! ।
पूर्वपुण्ये तो ज्यावरी पडे वो ! ।।१।।
गुरुचरणीचे रज हे निर्मळ वो ! ।
तेणे मंडित जयाचे निढळ वो ! ।।२।।
गुरुमुखिचे शेष हे चांगले वो ! ।
त्याने हृदयकमल ज्याचे रंगले वो ! ।।३।।
गुरुकृपा घालुनि अंजन वो ! ।
झाले सर्वो सर्वदा निमग्न वो ! ।।४।।
गुरुवाचुनि नेणति काही वो ! ।
म्हणे *केशव* शरण त्याचे पायी वो ! ।

(१०२)

मज अखंड राघव कळला रे ! । कल्पतरू गुरु फळला रे ! ।।ध्रु।।
रामाच्या विसरे रचिले रे ! । मायेचे भिताड खचले रे ! ।।१।।
प्रीति निरंतर लागलि रे ! । तेणे अनादि माया भंगलि रे ! ।।२।।
संग संगातीताचा घडला रे ! । *केशव* अद्वयपदी जडला रे ! ।। ३।।

(१०३)

बोलणे सांडी बोलणे सांडी ।मौन्यवरि तू आसन मांडी ।।ध्रु।।
बोलाचे उंडे बोलाचे मांडे । बोलासाठी केवि तरसिल भांडे ।।१।।
बोलणें अबोलणे सारुनि दोन्ही । बोलसी तरि बोल शब्दाते गिळुनी ।।२।।
सद्गुरुकृपे *केशवि* पाही । बोलणे अबोलणे नुरेचि काही ।।३।।

(१०४)

खटपट कां बा ! करितोसि ? । लटिकेचि नासिक धरितोसी ।।ध्रु।।
धणिवरि हरिला पाहसिना । तत्पदि निश्चळ राहसिना ।। खटपट०।।१।।
वरिवरि करिसी गुणगुण । अंतरी नाही निज खूण ।। खटपट०।।२।।
भस्मे उधळिली निजकाया । निरसली नाही निजमाया ।। खटपट०।।३।।
वरि वरि जपसी हरिनाम । अंतरि भरला दृढ काम ।। खटपट०।।४।।
*केशव* सांगे खूण निकी । अंतरि धरूनि राही सुखी ।। खटपट०।।४।।

(१०५)

ऐसा पुत्र देगा देवा ।। जग म्हणे ज्याला बावा ।।१।।
कन्या ऐसी तरी देई ।। जैसी मिरा मुक्ताबाई ।।२।।
ऐसा भक्तराज गुंडा ।। त्याचा तीही लोकी झेंडा ।।३।।
इतके न देवे तुझ्याने ।। माझे करी गा निसंतान ।।४।।
दोही माजी एक लेखा ।। बोले *केशव* दास चोखा ।।५।।

(१०६)

सद्गुरूराया रे सखया श्रीगुरूराया रे ।
श्रवणे मनने अद्वय भजने हरिली माया रे ।।ध्रु।।
मस्तकि हस्त ठेऊनि आपुला वनमाळी दाखविला ।
संशयजाळी उकलुनी वेगे हरीरस चाखविला ।। सद्गुरु०।।१।।
अक्रिय गतीने सम्यक रीतीने अपार निवविले ।।
विवेक परता सारुनि ताता जिवेवीण जिवविले ।। सद्गुरु०।।२।।
मंगलवदना मंगलसदना गतिविण पावविले ।।
*केशव* म्हणे मज केशव देउनी गुरूपदी नांदविले ।। सद्गुरू०।।३।।



(१०७)

नरदेह जातोरे उगला । घालूनी ममतेचा घाला ।
सावध हो कां रे ! वहिला,। सत्वर लागे भजनाला ।।ध्रु।।
शांती नाही रे ! म्हणसी । व्यर्थचि प्राण्या ! भुललासी ।।
संचित केले सायासी । अंती टाकुनिया जासी ।। नर०।।१।।
जन्मा येउनि आतां । कांही तरि करि रे ! सार्थकता ।।
*केशव* माधवी अनुसरता । पावन झाला पद गातां ।। नर०।।२।।

## श्रीसंत उद्धवचिद्घनमहाराज कृत अभंग

(१०८)

ज्याचे वंशी कुलधर्म रामसेवा ।त्याचे वंशी मज जन्म दे गा देवा ।।१।।
ज्याची वाणी रंगली रामनामी ।त्याचा माझा संवाद घडो स्वामी ।।२।।
वारंवार विनंती परिसावी । दयासिंधुची पूर्ण कृपा व्हावी ।।३।।
म्हणे *उद्धव चिद्घनमहाराज* । रामदासांचा संग घडो मज ।।४।।

(१०९)

सज्जन यासाठी यासाठी । अवतरले या सृष्टी ।।ध्रु।।
न बोलणे बोलावे । न दिसे ते दृष्टी दावावे ।।१।।
सद्रूप हे जग माया । ऐसे साधक जन समजाया ।।२।।
भेद लयाप्रति नेला । *उद्धवचिद्घन* अद्वय केला ।।३।।

## श्रीसंत आनंदमूर्तीस्वामी कृत अभंग

(११०)

गुरुरायाचे नाम सार सेवी रे । चित्त गुरुपदांबुजी ठेवी रे ।।१।।
मग काळाचे भय तुला नाही रे । गुरुकृपे तरसील पाही रे ।।२।।
स्वामी सच्चिदानंद *आनंदमूर्ती* रे । नको विसरू तयाची चरण कीर्ती रे ।।३।।

## श्रीसंत श्रीधरस्वामी कृत अभंग

(१११)

नाथाचे घरची उलटीच खूण । पाण्याला मोठी लागली तहान ।।ध्रु।।
बाई एक मी नवल देखिले । वळचणीचे पाणी आढ्याला गेले ।।१।।
हातात घागर बाहेर पाणी । पाण्यासि पाणी आले बांधोनी ।।२।।
शेत पेरिले त्यासी कणीसी आले । राखणवाल्यासी त्याने हो गिळिले ।।३।।
मडके खाउन भात टाकुन दिधला । बकऱ्याचे पुढे देव कापिला ।।४।।
*श्रीधरस्वामी* म्हणे मार्ग हा उलटा । जाणेल तोचि गुरूचा बेटा ।।५।।

## श्रीसंत आनंदनंदनस्वामी कृत अभंग

(११२)

साधू गृहाप्रती आले । भले सार्थक झाले ।।ध्रु।।
दसरा हा मज हीच दिवाळी । स्वात्मसुखी मन धाले ।।१।।
सर्व जयंत्या आजचि आम्हा । अंतरी संत निमाले ।।२।।
*आनंदनंदन* बोलती वाचे । निःसंग दैव उदेले ।।३।।

## श्रीसंत अमृतराय कृत अभंग

(११३)

संतपदाची जोड । दे हरी संतपदाची जोड ।।ध्रु।।
संतसमागम आत्मसुखाचा । सुंदर उगवे मोद ।।१।।
सुफलित करुनी पूर्ण मनोरथ । पुरविसी जीवीचे कोड ।।२।।
*अमृत* म्हणे रे हरिभक्तांचा । शेवट करिसी गोड ।।३।।



## श्रीसंत मुकुंदराय कृत अभंग

(११४)

मन जडले गुरुपायीं । आतां, जन्ममरण मज नाहीं नाहीं ।।ध्रु।।
रक्तश्वेत झाली मिळणी । शामसुनीळ केली अटणी ।।१।।
पीत प्रभा लखलखाट । तोचि माझा उन्मनी घाट ।।२।।
स्वस्वरूपी लागला डोळा । निज तेजाचा हाचि उमाळा ।।३।।
सोहंभावे *मुकुंदरायी* । भरला निजगुरु सर्वां ठायी ।।४।।

## श्रीसंत महिपती कृत अभंग

(११५)

मौज दिसते रे । आजि मोठी मौज दिसते रे ।।ध्रु।।
ध्वनिमध्ये मन रंगुनि गेले । भ्रूभंगावरी लक्ष्य लागले ।।
न ढळे पाती नीर चालले । लाटचि येति रे ।।१।।
अरुणोदयसम सुरंग सगळे । विजा चमकती बहु कल्लोळे ।।
येके येके जळी उठति विशाळे । भासति नासति रे ।।२।।
पाहतां पाहतां न दिसे कांही । दिसते परि ते फिर फिर पाही ।।
मागे पुढें दाटले घनदायी । सहजचि ज्योती रे ।।३।।
नरहरिनाथे हस्तकी धरिले । जन्म मरण हे सहज विसरले ।।
*महिपती* नयनी स्वरूप भरले । स्वयंज्योति रे ।।४।।

(११६)

कशि मोहनी घातली गुरुनं । मशि वेडचि गेले भरून ।।ध्रु।।
श्रवणांत पेरणी केली । ती नयनी उजेडा आली ।।
मन पवन चित्त एक करून ।।१।।
ऐकतां गजर भूल पडली । वीज आकाशांत कडकडली ।।
मन पवन चित्त दृढ धरून ।।२।।

नव ग्रास घालितां मुखी । दहाव्यांत जाहले सुखी ।।
अकराव्या घरा जाऊन ।।३।।
नरहरीनाथगुरु-भजनी । दास *महिपति* लागे चरणी ।।
माझे मीपण गेले पुसून ।।४।।

## श्रीसंत शिवराम कृत अभंग

(११७)

गुरुने तार सुनाई रे । क्या कहु व्हांकि बढाई रे ।।ध्रु।।

नाभिकंदका डेरा बनाया उपर दंडी चढाई ।
नेट बोटकी खूटी गाढी सोहं तार जडाई ।।१।।

प्रेमभावसे तार बजाई तब सब संग छुडाई ।
अनुहत नाद उठा जब प्यारे जीव शिवनकूं मिलाई ।।२।।

दास कहे *शिवराम* प्रभुकी पूरन धुंदी चढाई ।
आपहि आप दुजा नहि कोई प्रेममगनमे लुडाई ।।३।।

(११८)

गुंग मला केले । गुरूने गुंग मला केले ।।
एकाएकी भुरळ घालुनी माझे मीपण नेले ।।ध्रु।।

जाता जाता नवल जाहले मन हे पांगुळले ।।
नामरूपातीत पुरूष त्यांचे दर्शन ते झाले ।।१।।

गपकन अंधार पडल बाई, झपकन उजाडले ।।
चंद्रसूर्य नसता तेथे तेज प्रकाशले ।।२।।

अर्धचंद्र अमृत बाई पिउनीया धाले ।।
ब्रह्मानंद *शिवरामी* जन्ममरण चुकविले ।।३।।



(११९)

विषय इंद्रियें जड ओळखणे तेंची विरक्ती ।
चैतन्याकडे वृत्ति फिरवणें या नावें भक्ती ।।१।।

मी चिद्‌धन वस्तुची प्रतीती शुद्‌ध ते ज्ञान ।
यापरि त्रिवेणीचे नित्य करावें स्नान ।।२।।

वर्णाश्रमसह युक्ताचारचि इंद्रियां घडे ।
विरक्ति भक्ति ज्ञान हातां आपेआप चढे ।।३।।

मुळिचा विचार हरपे हर्षामर्ष मग कैचे ।
*शिवराम* भजें पाय पूर्णानंदाचे ।।४।।

## श्रीसंत शिवदिनी कृत अभंग

(१२०)

माझी देवपुजा देवपुजा । पाय तुझे गुरुराजा ।।ध्रु।।
गुरुचरणाची माती । तीच माझी भागीरथी ।।१।।
गुरुचरणाचा बिंदु । तोचि माझा क्षीरसिंधु ।।२।।
गुरुचरणांचे ध्यान । तेचि माझे संध्या-स्नान ।।३।।
*शिवदिन* केसरिपायी । सद्‌गुरुवांचुनि दैवत नाही ।।४।।

(१२१)

उन परवारी जावो रे । उनके पाव परो रे ।।ध्रु।।

दो नयनोंका उलटा मारा । सब घट देखे साई ।।
निंदा स्तुती कोई एक जाने । ओ एक लाल गुसाई ।।१।।

नव दरवाजे दसवी खिडकी । उप्पर है एक फीरकी ।
विरळा साधु कोई एक जाने । लेकर मन की गिरकी ।।२।।

*शिवदिनका* प्रभू केसरी साहेब । आगम निगम का राजा ।
अनुहात शिंगी निशिदिनी बाजे । बाजत तनका बाजा ।।३।।

## श्रीसंत भगवंतात्मज कृत अभंग

(१२२)

कोणी कांही म्हणा मन जडले ।।ध्रु।।
गुरुरंगाने रंगुनि गेलो । न घडावे ते घडले ।।१।।
पृथ्वीचे जळ आकाश-पंथी । न चढावे ते चढले ।।२।।
*भगवंतात्मज* म्हणे गुरु पातक । न झडावे ते झडले ।।३।।

## श्रीसंत श्रीरंगात्मज विठ्ठल कृत अभंग

(१२३)

धन्य धन्य हो प्रदक्षिणा सद्गुरुरायाची ।।
झाली त्वरा सुरवरां विमान उतरायाची ।।ध्रु।।

पदोपदी झाल्या अपार पुण्याच्या राशी ।
सर्वहि तीथे घडली आम्हा आदि करुनिया काशी ।।१।।

मृदंग टाळ ढोल भक्त भावाते गाती ।
नामसंकीर्तने नित्यानंदे नाचती ।।२।।

कोटि ब्रह्महत्या हरती करिता दंडवत ।
लोटांगण घालिता मोक्ष लोळे पायात ।।३।।

गुरुभजनाचा महिमा न कळे आगमानिगमासी ।
अनुभवी ते जाणती जे गुरुपदिचे रहिवासी ।।४।।

प्रदक्षिणा करुनि देहभाव हरविला ।
श्रीरंगात्मज *विठ्ठल* पुढे उभा राहिला ।।५।।



## श्रीसंत सहजानंद कृत अभंग

(१२४)

मंगळसूत्र काजळ कुंकू पाठविले गुरुने ।।
अहेवपण वाढो म्हणुनी दिले आशीर्वचन ।।ध्रु।।

नवविध भक्ति खडे कोंदण मंगळसूत्रासी ।।
अष्टभाव ते सात्त्विक रंग दिले कुंकुमासी ।।१।।

काय सांगू मी आजि गडे ग अलंकारशोभा ।।
इडा पिंगला नाकी नथणीचा आत्मबिंबगाभा ।।२।।

अन्वयव्यतिरेकांचे पैंजण वाजतात पायी ।।
*सहजानंदा* ऐसा सद्गुरू त्रिभुवनांत नाही ।।३।।

## श्रीसंत ज्योतीपंत महाभागवत कृत अभंग

(१२५)

दाविली काशी ।। गुरूने माझी मजपाशी ।।ध्रु।।

मजला पूर्वेहुनि काढिले ।। पश्चिमपंथे चालवीले ।।
एकवीस स्वर्गावरती नेले ।। मूळ तीर्थासी ।।१।।

अवघड पश्चिमेची वाट ।। बिकट त्रिकुटीचा घाट ।।
श्रीहाट गोल्हाट औट पीठ ।। ओलांडुनि त्यासी ।।२।।

इडा पिंगला सुषुम्ना ।। गंगा सरस्वती यमुना ।।
तिचे संगमी करुनी स्नाना ।। मुक्ति जीवनासी ।।३।।

पाहिले सहस्रदळ कमळ ।। तेथे मुनिजनांचा मेळ ।।
हंस बाळ खेळे खेळ ।। केवळ संन्यासी ।।४।।

ऐशी देहिच यात्रा केली ।। कावड रामलिंगा वाहिली ।।
*ज्योतीयाने* खेप चुकविली ।। लक्ष चौऱ्याऐंशी ।।५।।

## श्रीसंत कृष्णाबाई कृत अभंग

(१२६)

नारायण श्रीमंत । आमुचा नारायण श्रीमंत ।।ध्रु।।

दारिद्र्याचा लेश नसे ज्या । लक्ष्मीपती गुणवंत ।
आमुचा नारायण श्रीमंत ।।१।।

चरणि जयाच्या वाहे त्रिवेणी ।चतुरानन सुतवंत ।
आमुचा नारायण श्रीमंत ।।२।।

नारायण पदी राहे *कृष्णा* । अन्य नावडे पंथ ।
आमुचा नारायण श्रीमंत ।।३।।

## श्रीसंत मध्वमुनिश्वर कृत अभंग

(१२७)

राम कथा रस पी । पी प्राण्या रामकथा रस पी ।।ध्रु।।
रामकथारस सेविसी जरी तू । काळ करील मग जी जी ।।१।।
संतत संपत जाय जिणे मग । इच्छा धरणे छी, छी प्राण्या ।।२।।
*मध्व मुनीश्वर* स्वामी रमापति । दुष्ट जनाप्रती भी, भी प्राण्या ।।२।।

(१२८)

तू माझा यजमान । रामा तू माझा यजमान ।।ध्रु।।
जननी जठरी रक्षियले मज । पोसुनी पंचहि प्राण ।।१।।
बाहेर येता मातेचे स्तनी । पय केले निर्माण ।।२।।
ऐसे असता या पोटाची । का करू चिंता जाण ।।३।।
*मध्वमुनीश्वर* स्वामी रमापति । धरी माझा अभिमान ।।४।।



## श्रीसंत सूरदास कृत अभंग

(१२९)

निरधनको धनि राम । हमारो ।।ध्रु।।
खान न खर्चत चोर न लूटत । साथे आवत काम ।।१।।
दिन दिन होत सवाई दीढी । खरचत को नहीं दाम ।।२।।
*सूरदास* प्रभू मुखमों आवत । औरसको नहीं काम ।।३।।

(१३०)

टारे नाह टरे । करमगती टारे नाह टरे ।।ध्रु।।
दशरथ मरण सीताहरण । बन बन राम फिरे ।।१।।
पाचो पांडव विरप्रतापी । हातमो झोली धरे ।।२।।
गुरू वसिष्ठ पंडित ज्ञानी । लगनकु शोध करे ।।३।।
*सूरदास* प्रभु जो हुवे सो हुवे । भटकत कौन फिरे ।।४।।

## श्रीसंत मीराबाई कृत अभंग

(१३१)

मोरी लागी लटक गुरु चरणकी ।।ध्रु।।
चरन बिना मज कछु नहीं भावे । झूंठी माया सब सपननकी ।।१।।
भवसागर सब सुख गयी है । फिकीर नहीं मुझे तरननकी ।।२।।
*मीरा* कहे प्रभु गिरधर नागर । उलट भयी मोरे नयननकी ।।३।।

## श्रीसंत विठ्ठल पुरंदर कृत अभंग

(१३२)

देवा बंदा नम्म स्वामी बंदा ।।
देवरदेव शिखामणियु बंदा ।।ध्रु।।

मंदरोद्धर बंदा ।। मामनोहर बंदा ।।
वृंदावनपति गोविंद बंदा ।।१।।
उरगशयनने बंदा ।। गरुडवाहन बंदा ।।
नरगोलिदवां बंदा ।। नारायण बंदा ।।२।।
नित्यतृप्तने बंदा ।। निगमागोचर बंदा ।।
सत्यश्री *पुरंदर* ।। *विठ्ठलता* बंदा ।।

## श्रीसंत मंबाजीबुवा कृत अभंग

(१३३)

सद्‌गुरु नाम निरंतर घेई । मनुजा राहे गुरुपायी ।।ध्रु।।
उगाच रडसी का धडपडसी । बुडसी भवडोही ।।
बोध परिसुनी शोध करी मनी । अजुनी सावध होई ।।१।।
सगे सोयरे बाईल पोरे । मायबाप भाई ।।
दो दिवसाचे असती साचे । जीविचे कुणी नाही ।।२।।
जाळील पोळील काळ खुळ्या मग । पळसी कोण्या ठायी ।।
हृदय कळवळे म्हणुनी बोले । *मंबाजी* गुरुभाई ।।३।।

## श्रीसंत भिमदासमहाराज कृत अभंग

(१३४)

आम्ही भोळे आम्ही भोळे । पिंड ब्रह्मांडा वेगळे ।।ध्रु।।
आम्ही वेडे आम्ही वेडे । जीवशिवा पलिकडे ।।१।।
आम्ही लुच्चे आम्ही लुच्चे । नित्य ब्रह्मपदी नाचे ।।२।।
*भिमदास* म्हणे आम्ही । मिरास केली परब्रह्मी ।।३।।



## श्रीसंत कलावतीआई कृत अभंग

(१३५)

सद्‌गुरु माझे, जीवीचे जीवन । तयाविण आन, नेणे मी हो ।।१।।
सद्‌गुरु माझी, प्रेमळ माऊली । कृपेची साऊली, वर्णू काय ।।२।।
सद्‌गुरुनी प्रेमपय पाजविले । भजनी गोविले सर्व काळ ।।३।।
सद्‌गुरुनी मज आशीर्वाद दिल्हा । तेणे हरूष भरला, हृदयी माझ्या ।।४।।
सद्‌गुरुनी माझ्या शिरी ठेविला करु । आठव ना विसरू, ऐसे झाले ।।५।।
सद्‌गुरुकृपे, तरलो तरलो । आता मी न उरलो, दुजेपणे ।।६।।
अनाथांचा नाथ, पतितपावन । कलिमलदहन, सद्‌गुरु माझा ।।७।।

## श्रीसंत माणिकप्रभू कृत अभंग

(१३६)

समज मूढा! गुरुविण तुज गति नाही ।।ध्रु।।
योगयाग विधी येणे नोहे सिद्धी । व्यर्थचि खटपट पाही ।।१।।
हिंडोनि देशोदेशिं कोटी तीर्थवासी । शिणशी तूं नाना उपायी ।।२।।
सांगतसे *माणिक* करूं नको आणिक । लागू तूं सद्‌गुरुपायी ।।३।।

## श्रीसंत माधवतनय कृत अभंग

(१३७)

महाराज धन्य आजि झालो प्रभु आपुल्या दर्शने ।।ध्रु।।
मम पुण्य फळासी आले । म्हणुनिया चरण हे दिसले ।
मम पातक विलया गेले हो । प्रभु आपुल्या दर्शने ।।१।।
श्रुति वदती नेति नेति । कुणी वर्णु शकेना कीर्ति ।
निरसे मम दृढ भवभ्रांति हो । प्रभु आपुल्या दर्शने ।।२।।

तूं माय बाप गुरू आप्त । बाह्यांतरि अससी व्याप्त ।
करि मदीय पूर्ण सर्वार्थ । प्रभु आपुल्या दर्शने ।।३।।

तव नामी मन हे रंगो । विषयांत कधी नच गुंगो ।
देहभाव समूळ मम भंगो । प्रभु आपुल्या दर्शने ।।४।।

बहु जन्म घेतले देवा । *माधवतनय* तारावा ।
द्या चरणी पूर्ण विसावा हो । प्रभु आपुल्या दर्शने ।।५।।

## श्रीसंत पंतमहाराज बाळेकुंद्रीकर कृत अभंग

(१३८)

याहुनी मागणें काय ।। दत्ता ।।ध्रु।।
उत्साह देईं उत्सव करवीं ।। तूचि प्रेमळ माय ।।१।।
भक्ति देईं भक्त ह्मणवीं ।। स्मरतों तुझेच पाय ।।२।।
जन्म अनेक घेईन परी मी ।। *दत्तगुरु* गुणगाय ।।३।।

(१३९)

नाचत गुरुभजनी ।। आम्ही जाऊ निरंजनी ।।ध्रु।।
सहजचि आलो सहजचि जातो ।। राहुनी जनी विजनी ।।१।।
नाही कुणाचा मी माझे न कोणी ।। नाही मोह मनी ।।२।।
अवधूतकृपे समरस झालो ।। दत्त निरंजनी ।।३।।

(१४०)

जिकडे तिकडे सद्गुरु भरला ।। भजन कुणाचें कुठें करूं ।।ध्रु।।
अंतरी सद्गुरु बाहेरी सद्गुरु ।। माझा मीपणा तोहि सद्गुरु ।।१।।
जागृती स्वप्न सुषुप्ति सद्गुरु ।। तूर्याउन्मनी तीहि सद्गुरु ।।२।।
सद्गुरुविणें कांहीच नाहीं ।। अवधूत दत्त परात्परु ।।३।।



(१४१)

जीवन हे गुरूनाम माझे । जीवन हे गुरूनाम ।।ध्रु।।
नाम स्वधर्म नामची आश्रम । नामची नित्य नेम ।।१।।
नामची प्रेम नाम सप्रेम । नामचि कैवल्यधाम ।।२।।
नाम निरंजन नाम निरंजन । नामची दत्त प्रेम ।।३।।

## श्रीसंत पांडुरंगमहाराज ताम्हनकर कृत अभंग

(१४२)

एकनाथ पैठणवाला । सांगली आवडली त्याला ।।ध्रु।।

पंचक्रोशी ही दत्तप्रभूंची । कृष्णा वाहे अमृत जलाची ।
पावनभूमि तपोवनाची । स्थान पाहूनी रमला ।।१।।

कुलसंशोधन करिता करिता । केळकरांचे आले चित्ता ।
अनंत तनुची घेऊनी सत्ता । राधाकुशी अवतरला ।।२।।

एकनाथ गोविंद जाहला । हनुमंताची दीक्षा त्याला ।
नाम रसाचा पिऊनी प्याला । रंगी रंगुनि गेला ।।३।।

दासबोध हरिपाठ भागवत । ज्ञानेश्वरी रामायण सांगत ।
प्रवचन कीर्तन रंगी नाचत । डोलवी श्रोतृगणाला ।।४।।

पैठण क्षेत्री अतृप्त हेतू । सांगलीत पूर्णेच्छा होतू ।
हरिभक्तीचा कळस डोलतू । *पांडुरंग* मनी भरला ।।५।।

(१४३)

आता काय मागू देवा । घ्यावी अशीच सेवा ।।ध्रु।।

हा देह सर्व तुझा । लागो तुझ्याची काजा ।
हा एक हेतू मनीचा । जाणोनी छंद पुरवा ।।१।।

अखंड नाम वदनी । लावण्यरुप नयनी ।
कर्णी मधूर मुरली । रव नित्य ऐकू यावा ।।२।।

सेवेचे वर्म सांगा । उकलोनी *पांडुरंगा* ।
गुरुदत्त ज्ञानगंगा । ऐसी वहात ठेवा ।।३।।

(१४४)

उधळीत गेला फुले सुवासिक दुसऱ्या भक्तीची ।।
व्यवहारी परमार्थी केली वकीली जनतेची ।।ध्रु।।

आचरणाने दाविली महती नीती नियमाची ।।
अखंड चिंतन नामस्मरण सुलभ साधनाची ।।१।।

धैर्यवंत परी मूर्तीच केवळ मृदु सौजन्याची ।।
ज्ञानवंत परी वपूची केवळ विनम्र विनयाची ।।२।।

सदय ह्रदय निस्पृह जाणता शोभा भक्तीची ।।
फडकत ठेविली ध्वजा भूवरी सद्गुरु निष्ठेची ।।३।।

कीर्तनरंगी वृत्ती रंगली श्रीहनुमंताची ।।
भूमानंद *पांडुरंग* अभेद प्रेमरूची ।।४।।

(१४५)

त्रेतायुगी हनुमंते सेवा रामाची केली ।।
नैष्ठीक ब्रह्मचर्य आचरूनी कीर्ती गाजविली ।।ध्रु।।

रामावाचुनी अन्य नावडे एकदेशी झाला ।।
सर्व जग हे रामरूपची मानेना बोला ।।१।।

सर्व देशी तुज अन्वय दृष्टी कैसे सेवावे ।।
आपण तरोनी इतर जनाना कैसे तारावे ।।२।।

त्रेतांती श्रीहनुमंताने राम प्रार्थीयला ।।
संसाराचा अनुभव काही नाही मज मिळाला ।।३।।



राम म्हणे कलीयुगात मानव होऊनी कार्य करी ।।
रामदास गोंदवलेबाबा आवृत्ती दुसरी ।।४।।

कोटणीस आवृत्ती तिसरी रामप्रसादाने ।।
जगा डुलविले आपण डुलला कीर्तनरंगाने ।।५।।

दत्तगुरुकृपे *पांडुरंग* मनी अपार कवतुक ।।
राम केळकर ज्ञानमार्गीची विमान वाहतूक ।।६।।

(१४६)

संत महंता श्रीहनुमंता आरती ही तुजला
ओवाळीतो भक्ती भावे शांती द्यावी मला ।।ध्रु।।

युग दुसऱ्यामधी रामदीक्षा हनुमंता मिळली ।।
इतिहासाची पुनरावृत्ती कलीयुगी जहाली ।।१।।

देहाचे निरांजन करूनी प्रेमे घृत भरिले ।।
कर्मसूत्रे वाती जाळुनी ज्ञान उजळीले ।।२।।

प्रकाश लखलख पडता मंगल स्वस्वरूप दिसले ।।
चौदेहांतरी आनंदाचे भरते दाटले ।।३।।

ब्रह्मानंदी लागली टाळी वृत्ती बेफाम ।।
*पांडुरंग* गुरु दत्तात्रयपदी घेतो आराम ।।४।।

(१४७)

पुरा गोंदा म्हणुनी गुंडा सांगे मजला ।।ध्रु।।

म्हणुनिया दर्शना आलो । पाहुनि समाधान पावलो ।।
आनंदात रंगुनी गेलो । दिन चांगला ।।१।।

गुंडूबुवा विदेही साधू । शक्ती विलक्षण अगाधू ।।
परी हा तो सुख संवादू । कैसा घडला ।।२।।

गुंडूबुवा आणि हा गोंदा । त्यानी केले परमानंदा ।।
*पांडुरंग* रामानंदा । ठायी जडला ।।३।।

(१४८)

नारदाची गादी चालविली ज्याने । कीर्तन रंगाने भरले जग ।।१।।

धन्य तो हनुमंत दीक्षित रामाचा । तुरा वैराग्याचा शोभे शिरी ।।२।।

भवाचा बाधक भक्तीचा साधक । ज्ञानाचा उच्चांक पटकाविला ।।३।।

योगमार्ग गती शुद्ध ज्याची मनी । परमार्थ गमती रूप केला ।।४।।

बाहेरी सोवळा अंतरी कोवळा । प्रेमाचा जिव्हाळा मूर्तीमंत ।।५।।

*पांडुरंगा* दिला स्तवनाचा मान । वाङमय सुमन स्वीकारीले ।।६।।

(१४९)

हनुमान मूर्ती प्रगटली । हनुमान मूर्ती प्रगटली ।।ध्रु।।

भृगुवार मध्यरात्री । माघ कृष्ण तृतिय तिथी ।
पूर्ण एकांताची स्थिती । फेरी जाहली ।।१।।

एक प्रहर दासबोध । श्रवण भक्तीचा आनंद ।
सेवुनिया कीर्तनाची । सनद दिधली ।।२।।

एकोणीस चोवीस सन । स्थूल देह विसर्जन ।
प्रेम देह प्रगटवून । भेटी दिधली ।।३।।

प्रेमाचे प्रगटीकरण । गुलालाचे उधळण ।
राम गोविंद उभयतांची । वृत्ती रंगली ।।४।।

परम मुक्त हनुमंत । संत शिरोमणी पंत ।
चरणी शरण *पांडुरंग* । कीर्ती गायीली ।।५।।



(१५०)

जननी इंदिरा सुपुत्र राम जनक गोविंद ।
बीज जैसे फल ही तैसे हे झाले सिद्ध ।।१।।

पिता शुद्ध सात्वीक ज्ञानी भक्त विनयवंत ।
सुत ही जैसा पूर्ण विवेकी कवी बुद्धीवंत ।।२।।

कीर्तन समयी साथ करितो गाती वाजवितो ।
गोविंदाची सेवा करूनी आनंद लुटीतो ।।३।।

सोमेश्वरादी सिद्धमालिका राम शरण त्याला ।
सिद्धकृपेचे वारे भरले सिद्धभाव ठसला ।।४।।

कीर्तन करितो उड्या मारितो आपणा विसरतो ।
विसरा विसरूनी अनुसंधानी *पांडुरंग* रमतो ।।५।।

(१५१)

आरती हनुमंता जय जय आरती गोविंदनाथा जय जय ।।ध्रु।।
हरिकीर्तनरूप अवतरला तुम्ही । हरिकीर्तन दाता ।।१।।
हरिकीर्तनीया सहज केवळ । हरि श्रोतावक्ता ।।२।।
*पांडुरंग* गुरू दत्तात्रयपदी । दावी निजपंथा ।।३।।

(१५२)

मला गुरून कायसच दिलं । कानी काय बाय सांगितलं ।।ध्रु।।
गगनाच वस्त्र नेसवीलं । करि धरूनि अंकित केलं ।।१।।
ऐकण मंत्रमय केलं । कसकसच वाटु लागलं ।।२।।
सहाच शहाणपण गेलं । किती गोड गोड ऐकू आलं ।।३।।
चकचकीत चक्कर आलं । गरगरा फिरू लागलं ।।४।।
पाहता नवल एक झालं । मन मारून उन्मन केलं ।।५।।
*पांडुरंग* बाळ तान्हुलं । दत्त गुरून मोठ केलं ।।६।।

## श्रीसंत निंबरगीकरमहाराज कृत अभंग

(१५३)

गुरुचरण कमलदल्लि भृंग वागो नी ।
गुरुचरण कमलदल्लि भृंग वागो नी ।।ध्रु।।
स्थिरविल्ल संसार नरजन्मदोळु बंदु ।
परतत्त्वतिळिदु साधुरसंगवागो नी ।।१।।
मौन हिडिदु मुद्रि बलिदु ज्ञान ज्योति वळग नलिदु ।
स्वानुभवामृतसविदु निःसंग वागो नी ।।२।।
मुप्पिनमुनिय हिडिदवचन कप्पुगोरळ काडसिद्ध निद्देगेड ।
होगी साष्टांग वागो नी ।।३।।

## श्रीसंत रामभाऊमहाराज यरगट्टीकर कृत अभंग

(१५४)

गुरुनाथ चिदंबर भवजल पार करो ।।ध्रु।।
भवसागरमे मैं तो डुबत है । अब तुम मत बिसरो ।।१।।
तेरे खातर मैं छोड दिया सब । निशिदिनि ध्यान धरो ।।२।।
जगमे मुजकू कवन रखेगा । तुमबिन मन न भरो ।।३।।
इंद्रिय मुजकू खूप गांजत है । उसकू शांत करो ।।४।।
तूं तो धनि मैं साचा चाकर । वैसी किरत करो ।।५।।
तेरे हुकुमबिन कछु नहि हूवे । बिरिदा साच करो ।।६।।
तनुमनधनकू अर्पण किया । तारो *दास* न मारो ।।७।।

(१५५)

काय तुझ्या सेवेला चुकलो । सांग मला गुरुराया रे ।।ध्रु।।
मतिहीन मी काही न जाणे । युक्ती बुद्धी नाही रे ।



सर्व जाण तू मनिंचा आशय । करुणाकर तू पाही रे ।।१।।
धुंदी जाहली तव दरबारी । दाद माझी लागेना रे ।
कोठवर ओरडूं कोण पुसेना । भिक्षा न मिळे द्वारी रे ।।२।।
दाता तू मज देसी तरि दे । नातरि कोठे न मिळे रे ।
*दास* तुझा आशेने झुरतो । काय तमाशा पाहसी रे ।।३।।

(१५६)

जन्मा येऊनि हेंचि करावे । श्रीसद्गुरुला शरण जावे ।
महावाक्य ते विवरावे । निश्चय दृढ धरुनि ।।१।।
निशिदिनि तोचि ध्यास धरावा । बहू यत्ने अभ्यास करावा ।
साधन करूनीयां वळवावा । श्री आत्माराम ।।२।।
डोळा पाहावें ते निजरूप । सद्गुरुकृपे आपेआप ।
हरती सहजी भवभयताप । जन्ममरणाचे ।।३।।
अंतरी बहुतचि सावध रहावे । विवेकशस्त्रे मन आवरावे ।
दिसंदीस अभ्यासावे । साधन नेमाचे ।।४।।
कळतां कळतां सर्वहि कळते । वळतां वळतां सर्वहि वळते ।
दिसतां दिसतां तेचि दिसते । निजवस्तू रूप ।।५।।
ऐसी असता सुलभ युक्ती । साधनावरी नाही भक्ती ।
नर म्हणुनी तुम्हाप्रतीं । म्हणेल कोण ।।६।।
नरतनु आल्याचे सार्थक । करिसी नित्यानित्यविवेक ।
तरिच बाबा तुटे तूक । जन्ममरणाचे ।।७।।
ऐसी साधकाची स्थिती । सांगितली तुजला युक्ति ।
*दास* आठवूनि श्रीगुरुमूर्ति । सांगे सकळांशी ।।८।।

(१५७)

जरी तुम्हा खूण असेल लाधली । वामसव्य खाली पाहोनिया ।।१।।
जन्माचे सार्थक झालेसे जाणुनी । काळाने जिंकुनी सुखी रहा ।।२।।
नाही तरी येथे येवोनिया अर्थ । पाहुनि स्वहीत करा योगी ।।३।।
हेचि तुम्हा असे *दासाची* विनवणी । सद्गुरू चरणी लीन व्हावे ।।४।।

(१५८)

सद्गुरुनाथ सद्गुरुनाथ, मी अपराधी घ्या पदरांत ।।
बहुत पापी उद्धरिले, ऐसे ब्रीद रक्षीले ।।
येवढा पापी धरा हाती, *दास* येतो काकुळती ।।१।।

(१५९)

गुरुला शरण जाय रे । तुझा तूं शिव होय रे ।।
नको भवाब्धी बुडु रे प्राण्या । झडकरि सावध होय रे ।।ध्रु।।

समुद्राचा बिंदू रे । बिंदू पाहता सिंधु रे ।।
सिंधूमाजी मिळोनि जाता । पुढे सुखाचा कंदू रे ।।१।।

दिवसा पहाव्या तारा रे । रात्री रविचा फेरा रे ।।
सुरा सुरवरा दुर्लभ जे का । ते सुख गुरुच्या पोरा रे ।।२।।

आकाशातुनि वाट रे । न करावा बोभाट रे ।।
टाकुनि तिनशे साठ बाबा । घे वरचा एकसष्ट रे ।।३।।

ऐकाव्या या गोष्टी रे । हे सुख न मिळे सृष्टी रे ।।
नको होऊ तूं कष्टी बाबा । पाही आत्मा दृष्टी रे ।।४।।

अविनाशाचा गोळा रे । पुढे करुनिया खेळा रे ।।
जिता मुक्तीचा सोहळा भोगा । जमवुनि बारा सोळा रे ।।५।।

*दासाचे* ऐकावे रे । समजुनि उमजुनि पहावे रे ।।
ना तरि नरका जावे प्राण्या । कोणि तुला सांगावे रे ।।६।।



(१६०)

माझी प्रार्थना ऐका प्रभुजी हे मम प्राणेश्वरा ।।
तुमच्या मनास येईल ते करा ।।ध्रु।।

तुझा दास मी होऊनि तव पदि केले जेव्हा अर्पण ।।
तनु मन धन आणि ते मीपण ।।
तेव्हापासुनि सर्व तुझे हे जाया आणि गृह धन ।।
मजकडे काय तुम्हा आधीन ।।
आता तुम्हाला कळेल ते करा नाहि दुजा आसरा ।।
पतित मी पावन मजला करा ।।१।।

नाही तुम्हाला मागत कांही नका दडू भगवंता ।।
तुम्हावरती माझी सत्ता ।।
काय उणे तुजपाशी देवा सर्वांशी पाळिता ।।
देशी आपणचि न मागता ।।
तुमचे तुम्ही विचार करूनी हवे तसे पुढे करा ।।
मजला आठवा की विसरा ।।२।।

येथे माझे काहीच नाही निश्चय मम अंतरी ।।
म्हणुनिया आलो तुमच्या द्वारी ।।
नका मला हो आणिक काही येवढे द्या झडकरी ।।
*दासा* दर्शन वरचेवरी ।।
काय करू मी काही कळेना हीन दीन हाती धरा ।।
भवचक्रातुनि पार करा ।।३।।

(१६१)

भूमि आप वायु तेज व्योम तुचि निर्मिशी ।।
चंद्रसूर्य वर्ततातित तूचि त्यासि रक्षिसी ।।
धरामरा सुरासुरा तू निर्मिसी चराचरा ।।
नमो नमो दिगंबरा प्रकाशरूप सुंदरा ।।१।।

निरंजना जनावना तू दिसतोसि लोचना ।।
आता तुला मी प्रार्थितो दयानिधे तू घे मना ।।
काम क्रोध गांजिती तया आधीच संहरा ।।नमो०।।२।।

वेद शास्त्र वर्णिती तुम्हासि हो जगत्पति ।।
पुराण सर्व बोलती न जाय कोण दुर्गति ।।
पुराण पुरुष तू खरा तुम्हाविणे न दुसरा ।।नमो०।।३।।

पुष्कळासी पावलासि म्हणुनि कर्णी ऐकिले ।।
तसे मला तू पावशी म्हणुनि हे आरंभिले ।।
आता प्रभू कृपाळु व्हा ब्रीदावळी खरी करा ।।नमो०।।४।।

चकोरि चंद्र न्याहाळिला तसा मी लक्षितो तुला ।।
अहो कृपाघना मला तू म्हणविसी कि आपुला ।।
येई येई ईश्वरा तुम्हासि पाहू द्या जरा ।। नमो०।।५।।

विनवितो तुलाच मी मला नको तू विसरू ।।
कल्पवृक्षकामधेनु माय तू मी लेकरू ।।
धरा मला कि पोटसी जशी ती माय लेकरा ।।नमो०।।६।।

काळ मला ग्रासितोचि त्या हाती नका देऊ ।।
अहोजी प्राणनायका नका मला दगा देऊ ।।
तुझी आस धरुनि खास बैसलो हाती धरा ।। नमो०।।७।।

*राम* हा आराम फार म्हणुनि होसि आळसी ।।
मग कसा मी येइन हो शेवटी तुम्हापाशी ।।
नका उशीर लावु बा तू झडकरी करी त्वरा ।।
नमो नमो दिगंबरा प्रकाशरूप सुंदरा ।।८।।



(१६२)

उठा उठा साधू जन । साधा आपुले निजधन ।।
सांडा आळस उघडा नयन । घ्या दर्शन श्रीगुरुचे ।।१।।

निद्रा झडप घाली डोळा । तेणे आली तुज अवकळा ।।
झाला अवघा हा घोटाळा । स्वरूप पाहणे मग कैचे ।।२।।

निद्राभरे रात्र गेली । पहाटे साखरझोप आली ।।
दिवसा प्रपंच घालमेली । रिता वेळ मग कोठे ।।३।।

त्यातुनि घाले पडती फार । कामक्रोधाचे भडिमार ।।
त्यानी केले बहु जर्जर । निवांत वेळ मग कोठे ।।४।।

यास्तव बरवा विचार करी । सांडुनि आळस निद्रा वैरी ।।
साधन करुनी सुख घे करी । *दास* विनवी श्रीगुरुचा ।।५।।

(१६३)

काय सांगु महिमा या हो सद्गुरु पाहाया ।।
निशिदिनी हा उभा येतो भक्त रक्षाया ।।ध्रु।।
समुद्रासारिखा येतो मायबाप ।
जिकडे पहावे तिकडे अवघे ब्रह्मस्वरूप ।।१।।
जनी वनी व्यापुनी तोचि भरला गे माये ।।
कवणा काय म्हणु अवघा तोचि आहे ।।२।।
पाहता याचे रूप माझे मन झाले वेडे ।।
नाही तप मी केले नाही झिजविली हाडे ।।३।।
नाना यत्ने करती त्यासी न पडे दृष्टी ।।
सद्गुरुकृपे आम्हा सुलभ झाला जगजेठी ।।४।।
बरवा संत संग आम्हा फळला गे माये ।।
*दास* म्हणे वर्णू आता काय नवलाहे ।।५।।

## श्रीसंत तात्यासाहेबमहाराज कोटणीस कृत अभंग

(१६४)

धन्य निंबरगी क्षेत्र भूतळी । जेथे अवतरले ।
संत-राय श्रीतुकाराम ते । तारक जगी जाहले ।।ध्रु।।

मूळ प्रल्हाद तेचि अंगद । उद्धव पुढे जगती ।।
नामदेव मग तुकारामचि । पूर्ण ब्रह्म ज्योती ।।१।।

अवतारी या नाम नारायण- । राव हे धरियेले ।।
गुरुलिंगजंगम साधू ऐसे । प्रगट जन बोले ।।२।।

सिद्धगिरीश श्रीकाडसिद्ध । महामुनिवर पद धरुनी ।।
त्यांचे अनुग्रहे सिद्ध साधन । दावियेले करुनी ।।३।।

सत्पथ लोप झाला ऐसा । अनुभव दाखविला ।।
नामरूपाचा लाभ कैसा । मार्ग प्रगट केला ।।४।।

पतितपावन गुरुपदकमली । ठाव निरंतर ।
दीन होऊन मागतसे हा । *दास* अष्ट प्रहर ।।५।।

(१६५)

रघुनाथप्रिय गुरुवरस्वामी । पूर्ण ज्ञानदाता ।।
दीनपणाने लीन होऊनी । शरण आलो आता ।।ध्रु।।

द्रव्य अपार पदरी असता । त्याग तुवा केला ।।
मायबापाचा घरदाराचा । मोह नाही धरिला ।।१।।

अगाध निष्ठा गुरुपदी धरुनी । साधन त्वां केले ।।
गुरुकृपेने अक्षय वैभव । जोडुनि दावियले ।।२।।

दिगंतरी तव सत्कीर्तीचा । वाजताहे डंका ।।
ज्ञानप्रबोधे उद्धरिले जन । राव आणि रंका ।।३।।

रामदास श्रीसमर्थ स्वामी । तूचि सत्य अससी ।।
ज्ञानदृष्टीने पाहता *दासा* । ब्रह्मरूप दिससी ।।४।।



(१६६)

स्वयंभ सदना सुहास्य वदना । प्रगटलासि रामा ।
भवतारक तव पवित्र चरणी । देई नित्य प्रेमा ।।ध्रु।।

वाट धर्माची मोडली साची । सीग अधर्मा चढला ।
धर्म स्थापना करावयाचा । विचार मनी ठरला ।।१।।

आत्मस्वरूपा विसरुनिया मी । भवचक्री फिरलो ।
काय सुकृत होते नकळे । शरण पदी आलो ।।२।।

पूर्ण कृपेने नाममंत्र तो । कर्णी फुंकियला ।
जिकडे तिकडे देव निरंजन । निर्गुण दावियला ।।३।।

महाविष्णू तू एकनाथ तू । स्वामी गुरुनाथा ।
*दास* प्रभूचा रामकृपेचा । वंदित पद माथा ।।४।।

(१६७)

लखलख ज्योती सद्गुरू तारा । ताऱ्यासी पाहूनी आत्म्यासी तारा ।।१।।
तारा तो पहावया शेषही थकला । शेषाचे मस्तकी तारा तो फुटला ।।२।।
तारा तो पहावया विश्वास धरा । विश्वास धरूनी विश्वासी तारा ।।३।।
विश्वास धरणे *श्रीरामपायी* । तारा तो लाधेल मानवदेही ।।४।।

(१६८)

हंसावरती राम बैसुनी चालिले हो पुढती ।
हंस कसा बघ उड्डाण करीतो खाली आणि वरती ।।ध्रु।।
खाली येता सवे उडतसे कोण जाणे गती ।
प्राणी निजला तरी हंस हा न सोडे निजस्थिती ।।१।।
हंस गगनीच्या मुक्ता माळा देई आणुनी हाती ।
अगणित तारे त्यात चमकती नाना रंग ज्योती ।।२।।
डोळे झाकूनी पहासी जरी तू स्वरूप दिसे पाही ।
*बाप सद्गुरू* कृपा करील हा लाभ घडे देही ।।३।।

## श्रीसंत गोपाळकाका कोटणीस कृत अभंग

(१६९)

सतत नाम गाई । गुरूचे ।।ध्रु।।
सम करोनी रविशशि दृष्टी । नासिकाग्रि नेई ।।१।।
चढुनि मेरुवरी नाम बळाने । अभंग तू होई ।।२।।
अग्रावरि पहा नीळ बिंदु तो । तल्लीनचि होई ।।३।।
अभिनव रंगी रत्न मौक्तिके । डोल देति पाही ।।४।।
*गोपालनाथ* हा भरोनि उरला । अणु रेणु ठायी ।।५।।

## श्रीसंत दादामहाराज कोटणीस कृत अभंग

(१७०)

अखंड कीर्ती चिन्मयमूर्ती । जगती अवतरली ।
भाग्य उदेले, निधान आले । संसृती ही सरली ।।१।।

चित्त रंगले, द्वैत भंगले । नामसुधा धारा ।
आपण घोटी, जगासी वाटी । ब्रह्मज्ञान सारा ।।२।।

आहार नाही, निद्रा नाही । काया शोषियली ।
मोक्षलक्ष्मी अकामता ही । शिष्यजना दिधली ।।३।।

*रघुनाथ* जोडी, हस्त न सोडी । माते तव चरणा ।
मुक्ताबाई तू गुरुमाय तू । अर्पितसे प्राणा ।।४।।

(१७१)

जय जय जय गुरुलिंगा । सत्‌चित्‌ सुखकंदा ।।
तव पदी शरण येता । हरसी भवबंधा ।।ध्रु।।

जगद्‌रूपी तू अससी । अससी निजयोगी ।।
वसतीस्थान तुमचे । धाम निंबरगी ।।१।।



ब्रह्मनिद्रेमाजी । माजी तू रमसी ।।
परमार्थाची किल्ली । निजभक्ता देसी ।।२।।

तव पदी युगुल रजाचा । लागत मधुवारा ।
माया भव निवारुनी । देसी सुख सारा ।।३।।

नारायण गुरुचरणी । शरण अनन्य ।।
प्रेमे आरती करिता । *रघुनाथची* धन्य ।।४।।

(१७२)

सद्‌गुरुपदी धरी अनन्य भाव तूं मना ।
हा गुरूपदेश वेदसार जाणरे मना ।
प्राण चित्त वित्त देह वाहि तूं गुरूपदा ।
सांप्रदाय सोडुनी मना नको चळूं कदा ।।१।।

वांछु तू नको परस्त्रिया परावि या धना ।
ज्ञान गर्व वाहुनी न निंदि साधु सज्जना ।
क्रोध काम लोभ मोह सांडि टाकि दुर्मदा ।
सांप्रदाय सोडुनी मना नको चळूं कदा ।।२।।

भ्रांति सोड शांति जोड प्रेम घेइ चिंतनी ।
ठेवि शास्त्र आत्मसद्‌गुरू प्रतीति घेउनी ।
विश्वसूनि तूं गुरू प्रबोधि राहिरे सदा ।
सांप्रदाय सोडुनी मना नको चळूं कदा ।।३।।

तूं भुलोन अन्य सांप्रदाय सेविसी जरी ।
तो न होय मोक्षदायि दे अधोगती खरी ।
दंभ दर्प हे त्यजूनि सेवि दैवि संपदा ।
सांप्रदाय सोडुनी मना नको चळूं कदा ।।४।।

मृत्युभीति नित्य वाहि सावधान तूं रहा ।
स्वात्मभाव भूतमात्रि सर्वदा हि तूं पहा ।
नित्य नेमसाधनी धरी हरील आपदा ।
सांप्रदाय सोडुनि मना नको चळूं कदा ।।५।।

लाज तूं धरूं नको गुरुगृहात राबता ।
श्वान होइ तूं गुरूप्रसाद नित्य सेविता ।
सद्गुरूपुढे कदा नकोचि दाउं श्रीमदा ।
सांप्रदाय सोडुनी मना नको चळूं कदा ।।६।।

ब्राह्म आधि हा मुहूर्त साधि ऊठ तूं त्वरे ।
वेदगर्भ नीज निष्ठ रामनाम गाइरे ।
ध्यानी चिंति जाश्वनीळ राममूर्ति तूं बुधा ।
सांप्रदाय सोडुनी मना नको चळूं कदा ।।७।।

श्रीगुरुपदाभिवंदना प्रभाति तू करी ।
व्याधि जन्म मृत्यु वारि पादतीर्थ तूं वरी ।
स्वात्मरूपि तूं समाधि नित्य घेई मुक्तिदा ।
सांप्रदाय सोडुनी मना नको चळू कदा ।।७।।

## श्रीगुरुलिंगगीतेतील अभंग

(१७३)

नमो नमो गुरुलिंगजंगमेशा ।।ध्रु।।
नामरहितने । नारायण महात्मने ।
भवकडिसो बेगने । निजधामने ।।१।।

करविरवाशा । श्रीगुरुकाडसिद्धेशा ।
भक्तरभाव दोळवाशा । सर्वेशा ।।२।।



प्रियरघुवरदाता । बेडिद वरव कोडुवाता ।
चिम्मडमठ दोळिरुवाता । गुरुनाथा ।।३।।

साधुपुरुषने । श्रीगुरु रामचंद्रने ।
साधुराज शिष्यने । चिमडवासने ।।४।।
हिंचगिरीशा । भाऊराव गुर्वेशा ।
श्रीगुरुनाम निवासा । साधकेशा ।।५।।
श्रीनागाप्पाण्णा । गुरुसाधन राणा ।
चरणि *गुरुसिद्दण्णा* । निरंजना ।।६।।

(१७४)

येनु इल्लदानू याक निन्न नीनू । सत्यचिदानंदनू आत्मारामा ।।१।।
बंदिल्ला जिवात्मा नोडगे वळगे । नाद बिंदू तोरिसी तम्मा ।।२।।
हिंग हिंग रामा कुडी गुरूनामा । गुरूपदकमलदल्ली भृंगचंद्रमा ।।३।।

(१७५)

समाधान शांतीवू हरिरूप कायन्नू । नादबिंदकलाज्योती चिद्मूलतत्वन्नू ।।१।।
नोडवीय कण्णलाद समाधान वद्गुवे । गुरूकृपाप्रसादन्न आड्गुवे माडवे ।।२।।
इल्याळल्ली मल्याळन्नु भालदल्ली शंभू । माडवेनू कृपा नीनूवे प्रेरणेयू स्वयंभू ।।३।।
यल्याळन्नू बारयन्नू रामकीर्तन गोविंदू ।प्रल्हादन्न हृदयन्न हुल्याळ घंटिनादू ।।४।।

(१७६)

प्रगटादा गुरु प्रगटादा ।
सिद्धानंदरूपसवादा नारायणा गिद्दा ।।१।।

कर्णादल्युदि कोट्टग्गे महाभेरिशंखनादा ।
शुन्यवु बीट्टादानू जीवशिवन वादा ।।२।।
रामकृष्णांतरदल्ली शीवतेज सुवे बंदा ।
अहंकारविल्लादानू वायोगविय वादा ।।३।।

सिद्धमुनियपादर्दिदा सिद्धानंद खुना गिद्दा ।
शिवने प्रल्हादन्नू चरणदास माडिद्दा ।।४।।

(१७७)
ॐ नम: शिवाय ॐ नम: शिवाय । ॐ नम: शिवाय ॐ नामा ।।ध्रु।।
सूवर्णन सिद्धलींग सूवर्णन गुरुलींग । गुरुलींगजंगम ॐ नामा ।।१।।
सहस्त्रारगिरिशिखर भीमरायरु दोड्ड क्षेत्र । प्रल्हादन्न अविरळ ॐ नामा ।।२।।

## श्रीसंत मामामहाराज केळकर कृत अभंग

(१७८)
गुरुपदी भाव धरी । मनुजा गुरुपदी भाव धरी ।।ध्रु।।
अभाव धरिता गुरुचरणासी । साधसी काय तरी ।।१।।
गुरुसेवेचा अगाध महिमा । वर्णन कोण करी ।।२।।
ब्रह्मादिक इंद्रादिक वंदिती । गुरुभक्तास शिरी ।।३।।
आत्मसुखचि हे गुरुपदी लाभे । वचनी प्रेम जरी ।।४।।
गुरुपद तारक नौका कलियुगी । *दासालागी* बरी ।।५।।

(१७९)
हेचि मला हरि दे । दे रे हेचि मला हरि दे ।।ध्रु।।
तव चरणांची नित्य ही सेवा । अखंडित घडू दे ।।१।।
तव पदकमली स्थिर मन माझे । चिंतनात रमू दे ।।२।।
आणिक काही *दास न* मागे । इच्छा मनी नसू दे ।।३।।

(१८०)
ह्रदयी वसे रघुवीर । प्राण्या, ह्रदयी वसे रघुवीर ।।ध्रु।।
त्याग नको करू घरदाराचा । ह्रदयी शोधित फीर ।।१।।
असल्या स्थितीतची नाम वदे जरी । नाही कशाची फिकीर ।।२।।
*दास* म्हणे रे सत्संगतीची । मानू नको तू जिकीर ।।३।।



(१८१)
बाप्पा ज्ञानिया रे । येई येई जीव जीवना योगिया रे ।।ध्रु।।
दूर करोनी विषय प्रीती । मना दावी तव स्वरूप दीप्ती ।
हे साधुनी इंद्रिय निवृत्ती । दे जया रे ।।१।।
सगुण निर्गुण रूप प्रचिती । ब्रह्माची साकारची मूर्ती ।
तव चैतन्य स्थिरता चित्ती । विजयी रे ।।२।।
संत सज्जना तूचि माऊली । *गोविंदा* करी कृपा साऊली ।
मम मस्तक हे जडवी पाउली । तुझिया रे ।।३।।

(१८२)
गुरुगृही मौज भारी । दिस ना जे चराचरी ।।१।।
गुरू दाविती नवल । जे का परमार्थाची ओल ।।२।।
गुरुकृपा भाग्य थोर । गुरुकृपे साक्षात्कार ।।३।।
गुरुपदीचा आनंद । भक्ता भेटवी गोविंद ।।४।।
गुरुनामी खरी सोय । जड जीवा तरणोपाय ।।५।।
*दासा* ह्रदयी हनुमान । सदा करी तो कीर्तन ।।६।।

(१८३)
पाठीराखा ज्याचा श्रीगुरु समर्थ । तयासी किमर्थ शोकचिंता ।।१।।
अनन्य असता सद्गुरु भजनी । वाहे चिंता मनी साधकाची ।।२।।
जन्म मरण भय तयाचे चुकले । धरीता पाऊले सद्गुरूंची ।।३।।
चिंता नाही जैसी मिळता चिंतामणी । सद्गुरु चरणी सर्व सिद्धी ।।४।।
घरी कामधेनू तया काय उणे । सद्गुरूंच्या गुणे तैसे *दासा* ।।५।।

(१८४)
रूप देखिल्या नयनी । सुख सुखा ये ज्याचेनी ।।१।।
तो हा श्रीराम सिंहासनी । सीता वामांकी जननी ।।२।।

लक्ष्मण भरत शत्रुघ्न । उभा हनुमान कर जोडून ।।३।।
बहुता पुण्ये ज्याची गोडी । हनुमंते लाविली गोडी ।।४।।
*गोविंद* तयाचा सेवक । पाहुनी सुखरूप देख ।।५।।

(१८५)

साधनी मन घटवी । बा रे साधनी मन घटवी ।
साधन कोठे कसे करावे । चित्ताला पटवी ।।१।।
मनोवृत्तीचा निरोध करुनी । नाम सदा आठवी ।।२।।
श्वासोच्छ्वासी नाम साधुनी । काळाला हटवी ।।३।।
साधनी घटता ते बळ अद्‌भुत । *दासाची* पदवी ।।४।।

(१८६)

आले भगवान आले संतजन । नवल महिमान ज्ञानेशाचे ।।१।।
ज्ञानाई ज्ञानाई बोलताती सर्व । निवालासे गर्व सुरवरांचा ।।२।।
विठ्ठल निवृत्ती मुक्ताई सोपान । नामा संतजन आलिंगीती ।।३।।
देव बैसविती ज्ञाना धरुनी हाती । ओवाळिती आरती रुक्मिण्यादि ।।४।।
सुरवर येती विमानांची दाटी । करिती पुष्पवृष्टी ज्ञानेशासी ।।५।।
कार्तिक वद्य त्रयोदशी माध्यान्हेसी । समाधी शेजेसी स्थिर झाले ।।६।।
ज्ञानदेवा लागी देवे दिला वर । दर्शने साचार मुक्ती तुझ्या ।।७।।
प्रेमपुरामाजी बुडाले सर्वही । तेथे *दास* पाही कैचा उरे ।।८।।

## ती.मातोश्री सौ.इंदिराबाई केळकर कृत अभंग

(१८७)

गोविंदरायानी किमया केली । पहा सांगली पंढरी जहाली ।।ध्रु।।
गुरूकृपेचे हे फळ । केले भवाचे निर्मूळ ।
नामस्मरणाने निद्रा जिंकीली ।।१।।
अडतीस वर्षे केले कीर्तन । एक दिवस न खंड जाण ।
तात्यासाहेबांनी मुद्रा दिली ।।२।।



मम प्रार्थना संतचरणी । कीर्तनसेवा व्हावी अजुनी ।
नामामृताने वृत्ती रंगली ।।३।।
हलके अंग रहण्यासाठी । कडूलिंबरस घेती वाटी ।
गोमुत्राची भाकरी खाल्ली ।।४।।
गाव सोडुनी नाही गेले । नोकरीसी त्याज्य मानिले ।
साडेतीनकोटीची पुरश्चरणे केली ।।५।।
ज्ञानेशांचे दर्शन झाले । स्वहस्ते चित्र रेखिले ।
हनुमंत माऊली प्रगटली ।।६।।

(१८८)

ब्रह्मरूपी तुम्ही मिळोनि गेले । मन निष्ठूर का केले ।।ध्रु।।
आमुचा कंटाळा आला । अवचित मजवरी पडला पडला घाला ।
हे हृद्‌गद तुमचे नाही कळले ।।१।।
भक्त लोक आणि पुत्र स्नुषाही । चौघे नातू असतानाही ।
मोहामध्ये नच सापडले ।।२।।
अडतीस वर्षे कीर्तन करूनी । सद्‌गुरू आज्ञा स्विकारोनी ।
द्रव्यासी तुम्ही नाही शिवले ।।३।।
प्रपंच परमार्थ दोनी केला । गरीबांचा तवदाता झाला ।
शक्तीनुसार द्रव्य दिले ।।४।।
बाळपणी बहू कष्ट केले । परमार्थाकडे लक्ष लाविले ।
धन्य जगीया झाले झाले ।।५।।
ज्ञानेशांचे दर्शन झाले । हनुमंत गुरू प्रत्यक्ष पाहिले ।
धन्य मातेच्या पोटी आले ।।६।।
संतसंग मजला घडला । परी तो मजला नाही कळला ।
अंतरी गुप्तचि ठेले ।।७।।

## श्रीसंत दासराममहाराज केळकर कृत अभंग

(१८९)

गुरुचा पंखा असावा वरती । डंका गाजे त्रिजगती ।।१।।
गुरुकृपेचे असावे छत्र । श्रीराम हालवितो सूत्र ।।२।।
रामनामी रंगलिये वाणी । हीच लावण्याची खाणी ।।३।।
*राम* म्हणे नका धरू शंका । एक हलवा गुरुपंखा ।।४।।

(१९०)

महाराज गुरुतृतीये आले । दर्शन गोविंदा दिधले ।।ध्रु।।
अर्धोन्मीलित दृष्टी जयांची । सहजासनी सजले ।
भक्ता न्यहाळुनि सगुण ब्रह्म ते । हृदयांतरी स्थिरले ।।१।।
चैतन्याचे भव्य मार्ग ते । दासबोधी दाविले ।
कीर्तनसरिता अंतर्यामी । ओघवती चाले ।।२।।
गुरूभक्तांचा प्रणाम घेऊनि । सप्रेमे धाले ।
हनुमंत प्रभु कृपाप्रसादे । त्रिविध ताप हरले ।।३।।
समर्पिता सुमने सुमनांजली । संतोषे ल्याले ।
हस्तद्वय तद्मस्तकी ठेवूनि । अदृश्यचि झाले ।।४।।
श्रीहरिकीर्तन नेम उपासना । अखंड चालविले ।
*दासराम* हा वंदन करितो । हनुमत्पदकमले ।।५।।

(१९१)

रेवणसिद्ध मरुळसिद्ध । काडसिद्धप्रभु शिवसदया ।।
गुरुलिंगजंगम अक्का माउली । साधुराज रघुनाथप्रिया ।।ध्रु।।
रामचंद्र प्रभु हनुमंत सद्गुरु । नागाप्पाते नारायणया ।।
रघुनाथ गोविंद गुरुजनाते । कीर्तनकाळी मनी नमुया ।।१।।



*बालराम* हा मागे निरंतर । कीर्तनी मती द्या गुण गाया ।।
हीच विनंती संतसज्जना । आशीर्वाद द्या दासा या ।।२।।

(१९२)

आपुले घर केले घर केले । घरीच अखंड ठेले ।।ध्रु।।
घरीच केली सेवा । घरी आणिले देवदेवा ।।१।।
घरीच आले गुरु । देती सेवेचा अधिकारु ।।२।।
ऐकती गुरु कीर्तन । मामा विसरती देहभान ।।३।।
अखंड कीर्तन करुनी । ज्योती झाल्या एकच दोनी ।।४।।
हरिनामाचा गजर । अनेक जीवांचा उद्धार ।।५।।
असंख्य जीव घर करिती । त्यांची न दिसे कोठे स्मृती ।।६।।
*बालराम* पदी ठेला । नामपंथ तो सुलभची सकळा ।।७।।

(१९३)

वाराची देव आमुचा । वारा हा भक्त तयाचा ।।ध्रु।।
वारा हा मायबाप । हरवी जो त्रिविध ताप ।
विश्वाचा करी संकल्प । तो आत्मा या जगताचा ।।१।।
हा सांगातीचा धर्म । हा संप्रदाय बहु सुगम ।
निःशब्द रूप आणि नाम । हा *दासराम* ज्याचा ।।२।।

(१९४)

सद्गुरुवाचोनी उमजेना वाट । उगीच बोभाट का करावा ।।१।।
सद्गुरुवाचोनी कळेना साधन । उगीच का शीण करुनी घ्यावा ।।२।।
सद्गुरुवाचोनी नोहे ते दर्शन । का करावी जाण खटपट ।।३।।
*दास* म्हणे यासी एकची उपाव । एक सद्गुरुराव आळवावा ।।४।।

(१९५)

उजळणी करु या हरिनामाची ।।ध्रु।।

श्रीहनुमत्प्रभु कृपामूर्ती ते । कीर्तनप्रेमाची ।।१।।

श्रीगोविंदजी विनम्र प्रतिमा । कीर्तननिष्ठेची ।।२।।

नामस्मरणी धमाल उडवू । जयजयकाराची ।।३।।

*दासरामी* या खूणगाठ ही । कीर्तनसेवेची ।।४।।

(१९६)

जगाचा तोडी या तटका । तरी तुझा लागे मज चटका ।।ध्रु।।

संकटे आदळोत पुढती । तरी तुझे नाम रमे चित्ती ।
आवडे संतबोध घुटका ।।१।।

नको मज मान दंभ चेष्टा । विनवितो तुजला रे श्रेष्ठा ।
मारी रे षड्रिपूला फटका ।।२।।

सर्वदा घडो तुझे स्मरण । नुरो या देहाचा भान ।
करी रे द्वंद्वातुनी सुटका ।।३।।

तुझेची रूप सदा आवडो । हरी तुझे दार मला उघडो ।
करी जो *दासराम* लटका ।।४।।

(१९७)

वाऱ्यावरी लागली नजर । देहभानाचा पडला विसर ।।ध्रु।।

जेथे तेथे परमेश्वर । ठायी नुरला गुणहंकार ।।
वारिया पोटीया गगन । सगुणा दावी निर्गुण ।।
निर्गुणी तुषारु सगुण । जगताची उठली लहर ।।१।।

वारियाची पावूनी सिद्धी । हरिभक्त हरी आनंदी ।।
सद्गुणाढ्य सद्रूप धुंदी । सहजची सहज समाधी ।।
वारे हे करी झणकार । श्रीहरीचा जयजयकार ।।
वाचा या सारुनी चार । हरिवाचे हरीचा गजर ।।२।।



सारुनी गुणागुणाते । गिळुनी शुन्याआतौते ।
रामकृष्णरूप त्यापुरते । शून्य हे पहाले जेथे ।।
ग्रासिता देखणे चित्ते । श्रीरामकृष्णहरी रुप ते ।।
निःशब्द ब्रह्म उमजे ते । *दासराम* हा किंकर ।।३।।

(१९८)

वारे भरले या नयनात ।।ध्रु।।

नादश्रवणी तदाकारता । एकची अखिल जगात ।।१।।

मागे शून्य पुढती शून्य । आहे कोण तयात ।।२।।

लक्ष्यालक्ष्य गुणी तो जाला । नटला नामरूपात ।।३।।

*दासरामी* हा सगुण निर्गुण । संतांचे स्मरणात ।।४।।

(१९९)

वारा माझा मी वाऱ्याचा । तोची देवही देवांचा ।।१।।

वारा माझियात आहे । आत बाही तोची वाहे ।।२।।

जेथे उदेले मीपण । तयाहोनी आन कोण ।।३।।

कोण देव कोण भक्त । *दासराम* शरणागत ।।४।।

(२००)

जाऊ दिवाळीला गुरुघरी । जाऊ दिवाळीला ।।ध्रु।।

दीपवाळीचा सण हा मोठा । लुटू या मौजेला ।।१।।

गुरुमायेला आलिंगुनिया । करू या भजनाला ।।२।।

गुरुपुत्रांचा मेळा बहुतची । साधनी या रमला ।।३।।

साधुराज हा चिमडच्या मठी । करी वास्तव्याला ।।४।।

रथोत्सवाचा समारंभ हा । पुनीत करी सकळा ।।५।।

*दासराम* हा रथरज रेणु । लेई निजभाळा ।।६।।

(२०१)

सर्वांचे अंतरी धर्म तो सारखा । दुजा भाव देखा नाही तेथे ।।१।।
जो का दरिद्यात तोची श्रीमंतात । म्हणोनी अद्वैत बोलताती ।।२।।
आत्मा तोचि धर्म नाम तो आचार । संत सदाचार बोलताती ।।३।।
*गोविंदतनय* सांगे सकळा अंतरी । भरला श्रीहरी सारिखाची ।।४।।

(२०२)

साधुराज माऊली ग माय माझी । साधुराज माऊली ।।ध्रु।।
जगदोद्धारास्तव अवतरली । चिमडमठी राहिली ।।१।।
आजानुबाहू भव्य अशी जी । गुरुमूर्ती शोभली ।।२।।
किती कनवाळू मवाळू गोजिरी । *दासरामी* पावली ।।३।।

(२०३)

गुरूतृतीया ही गोड किती होय सुखाची ।
जरी गाई कुणी गुणकीर्ती तृप्ती मनाची ।।१।।
हनुमत्प्रभूमहाराज मंदिरी उभा ।
नवलप्रभा दिपवी नभा प्रगटली आभा ।
शोभा ही काय वर्णू आज येथीची ।।२।।

(२०४)

पेठ वसविली सांगली ग्रामी हरिगुण नामाची ।
काय मौज त्या पेठेमाजी गर्दी उतारूंची ।।ध्रु।।
एक लक्षका रुपया देता देती हिरे तेरा ।
तेरामाजी साठविला तो परमेश्वर सारा ।।१।।
माल लागला बंदराला अमोलिक पाही ।
जो तो येतो घेऊनी जातो लक्ष देवुनी पाही ।।२।।



ययाकारणे सवंग जाहला खरा माल पाही ।
लूटची करिती घ्या घ्या म्हणती जेवी तृप्ती होई ।।३।।
कितीही लुटला तरी न संपे माल हा तो बरा ।
जो तो येतो घेऊनी जातो आनंदुनी घरा ।।४।।
पेठ वसविली सांगली ग्रामी हनुमंतरायांनी ।
छत्तीस वर्षे लुटुनी लुटले घ्या म्हणती कोणी ।।५।।
*राम* बाळ हा आनंदुनी नाचत हो गेला ।
मौक्तिकांचा चुरा पाहुनी अंतरी घेऊनी आला ।।६।।

## श्रीसंत स्वामीसूतमहाराज कृत अभंग

(२०५)

मागणे हे माझे स्वामी तुजपाशी । विघ्न भजनासी येऊ नये ।।ध्रु।।
तुझाची निरोप सर्वासी मी देतो । तुझे नाम गातो आवडीने ।।१।।
तेथे ही उपाधी न बाधो सर्वथा । बापा दीनानाथा सांभाळावे ।।२।।
*स्वामीसुत* म्हणे तूचि बापधनी । सांभाळी भजनी बालकासी ।।३।।

## श्रीसंत तुकडोजीमहाराज कृत अभंग

(२०६)

येतील गुरुराजे, पाहण्यासी । निर्मळ मंदिर माझे, येतील गुरुराजे ।।ध्रु।।
पुष्पे वाहीन मी, भावाची । घालीन माळ जिवाची ।
गुरुच्या हृदयासी । प्रेमाची, उटी लावीन गंधाची ।।१।।
नंदादीप जळे, भक्तीचा तारण तुटतो ।
त्याचा लागे ओलावा । ज्ञानाचा,पाझर वैराग्याचा ।।२।।
मनमंदिर हे सुंदरसे । दासी गोधन सरसे ।
दया, क्षमा, शांती अति सुरसे । मोहीत, होती सुरसे ।।३।।

सिंहासनी रमता हृदयाच्या । द्वादश कमलदलांच्या ।
वाजवी चौघडी या श्रद्धेच्या । सोऽहम् ध्वनी नादांच्या ।।४।।
*तुकड्या* दास म्हणे । निःसंगी मन हे निर्भय रंगी ।
गुरुच्या दरबारी सत्संगी । ब्रह्मानंद अभंगी ।।५।।

## श्रीसंत नानामहाराज बर्वे कृत अभंग

(२०७)

अनुदीन अभिनव कीर्तन चाले । हृदय भुवनी मधुमाधव डोले ।।ध्रु।।
प्राणापान ही एथ मिनले । सर्वांगी चैतन्य कोंदले ।।१।।
चैतन्याची अनुपम लीला ।देही विदेही मुदे नांदला ।।२।।
गोंविदी आनंद वर्षला । त्याची चाले कीर्तन लीला ।।३।।
*नानासी* तो आनंद झाला । आनंदे संतोष दाटला ।।४।।

## श्रीसंत ब्रह्मानंदमहाराज बेलधडीकर कृत अभंग

(२०८)

जेथे दिसती सद्‌गुरू चरण । तेचि आम्हा गोकर्ण ।।१।।
गोकर्णीचा महेश्वर । सद्‌गुरुनाथ खरोखर ।।२।।
माणगंगेचिया तीरी । लोळताती मुक्तीचारी ।।३।।
गोंदावले ऐसे भुवन । सद्‌गुरूंचे जन्मस्थान ।।४।।
गोंदावले ऐसे क्षेत्र । सोडुनी जावे का इतरत्र ।।५।।
*ब्रह्मानंद* सांगो कीर्ती । सद्‌गुरूवीण नाही गती ।।६।।

## श्रीसंत गजाननमहाराज अक्कलकोट कृत अभंग

(२०९)

त्रेलोक्य धुंडोनी, ऐसा एक दावी । आपुली पदवी, देई दासा ।।ध्रु।।
एका गुरूविण ऐसे करी कोण । आपुल्या समान करीत असे ।।१।।



दर्शन करीता पुण्य येई हाता । पाद स्पर्श होता जीवनमुक्त ।।२।।
*स्वामीदास* म्हणे सद्‌गुरूची वाणी । चारी वेद खाणी सत्य सत्य ।।३।।

## श्रीसंत स्वामी स्वरूपानंदमहाराज कृत अभंग

(२१०)

सखा माझा नारायण । करी चिंता निवारण ।।१।।
मज सावरिता हरि । आली विघ्ने दूर करी ।।२।।
दोष जाळुनी समस्त । शुद्ध करी माझे चित्त ।।३।।
तोचि लक्षी माझे हित । *स्वामी* म्हणे मी निश्चिंत ।।४।।

## श्रीसंत साधुदास कृत अभंग

(२११)

महाराज पुन्हा कधी येणार । बालका दर्शन कधि देणार ।।ध्रु।।

हसत मुखाने हसरे डोळे,उघडुनिया बघणार ।।
सगुण मूर्तीने ध्यानपरांच्या माणसात रिघणार ।।१।।

अध्यात्माची दिव्य दालने खोलुनि दाखविणार ।।
किर्तनगंगा सुधारसाची गोडी चाखविणार ।।२।।

भक्तजनांच्या नमस्कृतीना प्रेमाने घेणार ।।
त्रिविध यातना त्या सर्वाच्या विलयाला नेणार ।।३।।

*साधुदास* उधळी सुमने ती अंगावरी लेणार ।।
गर्भवास मुक्तीस्तव त्याला वरदायी होणार ।।४।।

(२१२)

साधुराज गुरुसदया । चिमड तीर्थ कृत निलया ।।
भक्तावन रतहृदया । शरण पातलो ।।ध्रु।।

मायामय ही सरिता । तुजवीण नच उद्धरिता ।।
अंत नाही मम दुरिता । तारि *दास* हा ।।१।।

(२१३)

तू माझा मी तुझा गुरुवरा । तू माझा मी तुझा ।
कुठे मग भाव राहिला दुजा ।।ध्रु।।
मी देह वाहिला तव सेवे कारणे ।
मम चित्त मिळाले तुजला अगतिकपणे ।
त्वद्रूप जाहले केवळ माझे जीणे ।
मी तुज वाचुनि साऱ्या विषया कधीच दिधली रजा ।।१।।
मी श्वास सोडितो तुजला संबोधुनी ।
मी गाणे गातो तुजला उद्देशुनी ।
मी येतो जातो तवरूपा आंतुनी ।
*साधुदास* कवि अद्वैताची द्वैती लुटितो मजा ।।२।।

## श्रीसंत कृष्णतनय कृत अभंग

(२१४)

किती आळवू मी आई तुजला । सोहं स्थिती करी मजला ।।
दर्शन दे आई मजला मजला । किती आळवू मी आई तुजला ।।ध्रु।।
हाक मारीता थकुनी गेलो । नयनी न पाहूनी आई शिणलो ।।
दर्शन दे आई मजला मजला । किती आळवू मी आई तुजला ।।१।।
*कृष्णतनय* हरी परमदीन । रेणुकाई तुजसी शरण ।।
दर्शन दे आई मजला मजला । किती आळवू मी आई तुजला ।।२।।



## श्रीसंत रंगनाथस्वामी कृत अभंग

(२१५)

तो योगी दिसे भला । जो जाणे निजब्रह्माला ।।ध्रु।।
ज्याचे अंगी गर्व हा नसे । दया आणि शांती स्वमनी वसे ।
जो पाळी परमार्थाला ।।१।।
पाळी नित्य नियम आदरे । पाही रूप हरिचे गोजिरे ।
जो *रंगी* रंगूनि गेला ।।२।।

***

## जयजयकार

**।। राजाधिराज श्रीसद्गुरुनाथ महाराज की जय।।**
**।। हनुमान गुरु की जय ।।**
**।। रघुनाथप्रिय साधुमहाराज की जय ।।**
**।। श्रीसद्गुरु श्रीगुरुलिंगजंगममहाराज की जय ।।**
**।। श्रीसद्गुरु श्रीमामामहाराज की जय ।।**
**।। इंदिरा गोविंद की जय ।।**
**।। श्रीसद्गुरु श्रीदासराममहाराज की जय ।।**
**।। रामसंजीवनी सीतामाता की जय ।।**
**।। मंगलमूर्ती मोरया ।।**

***

# श्रीदासराममहाराजांची ग्रंथसंपदा

१) मनोहर विनायक मंगळवेढेकर यांचे ओवीबद्ध चरित्र...............१९४०

२) श्रीज्ञानदेवतेहत्तिशी,सानंद टीकेसह,व तात्पर्यार्थसह श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा हरिपाठ...१९५२

३) श्रीज्ञानदेवमुद्राप्रकाश साधनमुद्रा टीकेसह, आणि ज्ञानेश्वरीसार........१९६८

४) वायुलहरी, आणि ज्ञानदेव आज्ञापत्र (ओवीबद्ध भावार्थ)............१९६९

५) ज्ञानेश्वरकृत दत्तस्तुति, श्रीदत्तस्तुतिप्रसाद ओवीबद्ध टीकेसह.........१९७१

६) श्रीज्ञानेश्वरकृत नमनस्तोत्र, भावार्थ नमनासह.........................१९७२

७) श्रीनारायणरावजीमहाराज यरगट्टीकर चरितामृत........................१९७३

८) श्रीनागाप्पाण्णामहाराज निंबरगीकर चरित्र.................(सन दिलेला नाही)

९) श्रीज्ञानेश्वरी चिंतनस्तोत्र व ज्ञानेश्वरी संकीर्तन स्तोत्र (भावार्थासह)....१९७४

१०) श्रीज्ञानेश्वरस्तोत्र....................................................१९७५

११) सिद्धस्तुती.......................................................१९७७

१२) अमृतानुभव - मंगलाचरण, मंगलप्रसाद टीकेसह.....................१९७९

१३) तात्यासाहेब कोटणीसमहाराज चरित्र.................................१९८३

१४) श्रीसंत राधाबाई अक्का यांचे चरित्र............................... (सन नाही)

१५) गुरुपाठ..........................................................१९८४

१६) सांप्रदायबोध.................................................... १९८४

१७) श्रीरामपाठामृत....................................................१९८४

१८) बाबासाहेब मुजुमदार यांचे चरित्र....................................१९८४

१९) श्रीएकनाथी भागवत : संक्षिप्त पाठस्तोत्र..............................१९८७

२०) नित्यपाठामृत......................................................१९८७

२१) संजीवनपाठ......................................................१९८७

# श्रीदासराममहाराजांची ग्रंथसंपदा

२२) श्रीदासरामवचनामृत..............................................१९८७

२३) नासदीयसूक्त, भावार्थ संगति.....................................१९८८

२४) श्रीगोविंददर्शन...................................................१९८८

२५) सांगली माहात्म्य ऊर्फ श्रीगंगाधरपंत चरितामृत.....................१९८८

२६) श्रीदासरामगाथा..................................................१९८८

२७) श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ, भावार्थ विवरण......................१९८९

२८) श्रीगुरुमहिमा.....................................................१९९१

२९) श्रीज्ञानेश्वरस्तोत्र व अन्य लघुग्रंथ.................................१९९७

३०) श्रीरामदासबोध...................................................१९९७

३१) श्रीचांगदेवपासष्टी, एक नाम कला.................................१९९९

३२) परमार्थासार आणि अन्य ग्रंथ (उद्धवरावजी महाराज यरगट्टीकरांच्या चरित्रासह)....२००२

३३) परमार्थ प्रश्नोत्तरी, आवृत्ती पाहिली व दुसरी........................२००२

३४) आरती संग्रह.....................................................२००२

३५) चांगदेव पासष्टी व इतर ग्रंथ.......................................२००२

३६) हरिपाठ संकीर्तन..................................................२००७

३७) श्रीदासराममहाराज : श्लोकरचना..................................२०१०

३८) अनुभवामृत सम-ओवी-टीकेसह.....................................२०१०

३९) परमार्थ प्रश्नोत्तरी, आवृत्ती तिसरी..................................२०१०

४०) आत्माराम (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह)...................२०१०

४१) ग्रंथत्रयी.........................................................२०११

४२) उत्तरगीता (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह)....................२०११

## ❖ श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प यादी ❖

| पुस्तकाचे नांव | पुष्प क्रमांक | सन |
|---|---|---|
| चिमड संप्रदाय | १ | २००५ |
| श्रीरामदासस्वामी चरित्र | २ | २००६ |
| भजन तरंग | ३ | २००६ |
| हरिपाठ संकीर्तन | ४ | २००७ |
| श्रीदासराममहाराज नित्यपाठ चरित्र | ५ | २००७ |
| दासबोधातील तत्त्वज्ञान | ६ | २००७ |
| श्रीदासराममहाराजांचा वचनसंग्रह | ७ | २००८ |
| श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज चरित्र | ८ | २००९ |
| साधन संध्या | ९ | २००९ |
| अनंत अमृत स्मरण | १० | २००९ |
| श्रीगुरु महिमा | ११ | २००९ |
| श्रीज्ञानेश्वरी प्रसाद | १२ | २००९ |
| श्रीदासराम गाथा : पुरवणी | १३ | २००९ |
| श्रीदासराममहाराज आत्मचरित्र | १४ | २०१० |
| श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर यांचे चरित्र | १५ | २०१० |
| श्रीदासराममहाराज : श्लोकरचना | १६ | २०१० |
| ज्ञानदेवकृत अनुभवामृत ओवी टीकेसहीत | १७ | २०१० |
| श्रीदासराममहाराज सहस्रनामस्तोत्रम् | १८ | २०१० |
| आत्माराम (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह) | १९ | २०१० |
| श्रीगुरुलिंगगीता (कानडी लिपीत) | २० | २०१० |
| श्रीगुरुलिंगगीता (मराठी) | २१ | २०१० |
| श्रीरामनिकेतन | २२ | २०११ |
| श्रीरामनिकेतनमधील आराधना | २३ | २०११ |
| ग्रंथत्रयी | २४ | २०११ |
| उत्तरगीता (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह) | २५ | २०११ |

## – सूची –


ॐ नम: शिवाय ६२

अखंड कीर्ती चिन्मयमूर्ती ५८
अनंत युगाचा देव्हारा १७
अनुदीन अभिनव कीर्तन ७२
अमृत-संजीवनी २३
अमृताहूनि गोड नाम ९
अरे! गाढवाच्या लेका! ८
अल्ला तेरे दर्गाम्याने २८
अंतरी निर्मळ वाचेचा १९

आकल्प आयुष्य व्हावे १०
आता काय मागू ४५
आता मी नये ३०
आधी गुरूसी वंदावे १२
आनंद केला बा, २९
आनंदु रे आजि ३
आनंदु रे! कि १४
आपुले घर केले ६७
आम्ही अपराधी अपराधी २६
आम्ही काय कुणाचे २६
आम्ही गोंधळी गोंधळी १५
आम्ही भोळे आम्ही ४२
आरती हनुमंता जय ४९
आले भगवान आले ६४
आवडीनें भावे हरिनाम ९

उजळणी करु या ६८
उजळले भाग्य आता १९
उठा उठा साधू ५५
उधळीत गेला फुले ४६
उन परवारी जावो ३७
उलट उलट माघारा ४

ऊस डोंगा परी २२

एकनाथ पैठणवाला ४५

ऐसा पुत्र देगा ३२

कल्याण करी रामराया २२
कशास जावे दूर ५
कशि मोहनी घातली ३५
कसा मला तारील २
कसि रे! विट १३
काय तुझ्या सेवेला ५०
काय वानू मी १९
काय सांगु महिमा ५५
किती आळवू मी ७४
किती एक येती २५
कैवारी हनुमान आमुचा २३
कैसें बोटानें दाखवूं २
कोण मी मज २४
कोणी कांही म्हणा ३८

खटपट कां बा ! ३२
खंडेराया तुज करिते १०

गुरुकृपांजन पाये मेरे ९
गुरुगृही मौज भारी ६३
गुरुचरण कमलदळि भृंग ५०
गुरुचा पंखा असावा ६६
गुरूतृतीया ही गोड ७०
गुरुनाथ चिदंबर भवजल ५०
गुरुने तार सुनाई ३६
गुरुपदी भाव धरी ६२
गुरुबिन कौन बतावे २७
गुरुरायाचे नाम सार ३३





गुरुला शरण जाय ५२
गुरूचरणी ठेवितां भाव १९
गुरू हा संतकुळीचा १
गुंग मला केले ३६
गोविंद गोविंद १७
गोविंदरायानी किमया केली ६४

घटका गेली पळे २४

जग रूठे तो २८
जगाचा तोडी या ६८
जननी इंदिरा सुपुत्र ४९
जन्मा येऊनि हेंचि ५१
जय जय जय गुरुलिंगा ५८
जरी तुम्हा खूण ५२
जाऊ दिवाळीला गुरुघरी ६९
जाजा जाजा तुम्ही २४
जिकडे तिकडे सद्गुरु ४४
जीवन हे गुरूनाम ४५
जे कां रंजले १७
जेणे राम देखिला २३
जेथे कीर्तन करावे २१
जेथे दिसती सद्गुरू ७२
ज्याचे वंशी कुलधर्म ३३
ज्याचे सुख त्याला १५

झडतो नामाचा चौघडा ११
झालि संध्या, संदेह ६

टारे नाह टरे ४१

तमाशा संताघरी १३
तू माझा मी ७४
तू माझा यजमान ४०
ते मन निष्ठुर ७
तो मज अठवितो २९
तो योगी दिसे ७५
त्याचे संगतिचा लागो ३१
त्या देवाचे दर्शन २३
त्रेतायुगी हनुमंते सेवा ४६
त्रेलोक्य धुंडोनी, ऐसा ७२

दाविली काशी ३९
देऊळ बांधियले सुंदर १८
देव देव म्हणुनी ३
देवा बंदा नम्म ४१
देव माझा मी २१
देवा आता ऐसा १२
देवा ऐके रे १६

धन्य धन्य हो ३८
धन्य निंबरगी क्षेत्र ५६

नजर न आवे २८
नमन माझे गुरूराया १८
नमो नमो गुरुलिंगजंगमेशा ६०
नमो रामराया २७
नरदेह जातोरे उगला ३३
नवमी करा नवमी २३
नाचत गुरुभजनी ४४
नाथाचे घरची उलटीच ३४
नाम वदता हे ९
नाम वाचे श्रवण २१
नामसंकीर्तन साधन पैं २०
नारदाची गादी चालविली ४८
नारायण श्रीमंत ४०
नित्य नवा कीर्तनी ७
निरधनको धनि राम ४१
निर्गुणाचा संग मला ४
निंदक कामाचा कामाचा ७

पाठीराखा ज्याचा श्रीगुरु ६३
पापाची वासना नको २०
पार्वतीवर । नमिला म्या १३
पुरा गोंदा म्हणुनी ४७
पेठ वसविली सांगली ७०
पोटापुरते देई १५
प्रगटादा गुरु प्रगटादा ६१
प्रपंच पडदा पडली २५

फळले भाग्य माझे ३

बाप्पा ज्ञानिया रे ६३
बा! रे! जन्मोनी ७
बोलणे सांडी बोलणे ३१
बोलू ऐसे बोल १०
ब्रह्मरस घेई काढा २०
ब्रह्मरूपी तुम्ही मिळोनि ६५

भूमि आप वायु ५३

मज अखंड राघव ३१
मन जडले गुरुपायीं ३५
मन रामी रंगले ६
मला गुरून कायसच ४९
महाराज गुरुतृतीये आले ६६
महाराज धन्य आजि ४३
महाराज पुन्हा कधी ७३
मंगळसूत्र काजळ कुंकू ३९
मागणे हे माझे ७१
माझी देवपुजा देवपुजा ३७
माझी प्रार्थना ऐका ५३
माझ्या सद्गुरूंची पाऊले २२
मायारे अनिवार २५
मी आलो रायाचा ८
मोरी लागी लटक ४१

मौज दिसते रे ३५
म्हणा श्रीराम जय २९

या या गुरुला २९
याहुनी मागणें काय ४४
येतील गुरुराजे, पाहण्यासी ७१
येनु इल्लदानू याक ६१
ये रे ये रे माझ्या ११

रघुनाथप्रिय गुरुवरस्वामी ५६
रत्नजडित सिंहासन १२
राम कथा रस पी ४०
राम गावा राम २६
रामनामाचे पोवाडे २१
राम राम म्हणता १३
रामा हो जयरामा २६
रूप देखिल्या नयनी ६३
रूप पाहता लोचनी १
रेवणसिद्ध मरुळसिद्ध ६६

लखलख ज्योती सद्गुरू ५७
लंबोदर गिरिजानंदना ५

वाराची देव आमुचा ६७
वारा माझा मी ६९
वारे भरले या ६९
वाऱ्यावरी लागली नजर ६८
विषय इंद्रियें जड ३७
विष्णुमय जग वैष्णवांचा १८
वेगें व्हावे सावधान १४
वेडियाच्या गावा गेलो ३०
वैष्णवां घरी सर्वकाळ १०

शरण शरण हनुमंता १२
शेवटची विनवणी २१



सखा माझा नारायण ७३
सगुण चरित्रें परम ५
सज्जन यासाठी यासाठी ३३
सतत नाम गाई ५८
सदा नामघोष करू १९
सद्गुरुनाथ सद्गुरुनाथ ५२
सद्गुरु नाम निरंतर ४२
सद्गुरुपदी धरी अनन्य ५९
सद्गुरु माझे, जीवीचे ४३
सद्गुरुवाचोनी उमजेना वाट ६७
सद्गुरूराया रे सखया ३२
समज मूढा! गुरुविण ४३
समाधान शांतीवू हरिरूप ६१
सर्वांचे अंतरी धर्म ७०
संगत संतनकी करले २८
संतपदाची जोड ३४
संत महंता श्रीहनुमंता ४७
साधकाची वृत्ती उदास १६
साधनी मन घटवी ६४
साधुराज गुरुसदया ७३
साधुराज माऊली ग ७०
साधू गृहाप्रती आले ३४
सीताराम कहोजी मनमो २७
सुख आले सुखा ३०
सुंदर ते ध्यान १६
स्वयं ब्रह्म जो ३०
स्वयंभ सदना सुहास्य ५७

हनुमान मूर्ती प्रगटली ४८
हरि आला रे २
हंसावरती राम बैसुनी ५७
ह्रदयी वसे रघुवीर ६२
हेचि थोर भक्ती २०
हेचि मला हरि दे ६२

***

### श्रीदासराममहाराजांची आरती

आरती रामराया । करी कृपेची छाया ।
दावोनी दीनी दया । धन्य धन्य महाराया ।।ध्रु।।

सद्गुरु हनुमंत । पिता गोविंद संत ।
बोधी गुरुलिंग सिद्ध । धरुनि रूप सिद्धानंद ।।१।।

सिद्धसाधनाने । स्वये ब्रह्मचि झाले ।
भावादरे *केशवाने* । चरणी मस्तक ठेविले ।।२।।

– प्रा.डॉ.के.वा.आपटे